



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा









रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. २५.०९.२०२४ | अंक नं. १७५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020












# मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण अखेर ९ व्या दिवशी स्थगित

जालना - मनोज जरांगे पाटील यांनी २५ सप्टेंबर रोजी आंदोलनाच्या ९ व्या दिवशी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे.

मराठा समाजाच्या वतीने मला उपोषण न करण्याचा आग्रह करण्यात आला होता. माझ्या माय माऊल्यांनी त्यासाठी मला वारंवार विनंती केली. त्यामुळे आपण उपोषण स्थगित करत असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. इतकेच नाही तर ज्यांनी - ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला, त्यांना सोडणार नाही, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.



राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज एकच असल्याचा दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. या निमित्ताने मराठा समाज एकत्र आला, हे एक चांगले झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आपल्या आंदोलनामुळे मुलींना मोफत शिक्षण मिळाले असल्याचा दावा त्यांनी केला. नेत्यांना आणि त्यांच्या मुलालाच मोठे करू नका. तुमच्या लेकींचे वाटोळे करू नका, मुलींना धोका देऊ नका, असे आवाहनदेखील त्यांनी यावेळी केले. एकाही नेत्याच्या सभेला जायचे नाही, असे आवाहन देखील त्यांनी केले. घरी बसून रहा पण नेत्यांच्या सभेला आणि प्रचाराला जाऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## कोणत्याही नेत्याच्या सभेला जाऊ नये; मराठ्यांना त्रास देणाऱ्यांना सरळ करणार

मराठा नेत्यांनी एकमेकांना साथ द्या, मराठा समाजाने कोणत्याही नेत्याच्या सभेला जाऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मराठा समाजातील माता बहिणी मोठ्या प्रमाणात आंतरवाली सराटी येथे येत आहेत. त्यामुळे राज्यातील मराठा समाजाचे हाल होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. याचबरोबर गावाच्या देखील काही समस्या आहेत. माता, भगिनींनी मला उपोषण सोडण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे आता आपण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली आहे. ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला आहे, त्यांनाही इशारा देत त्यांनी सुरुवात केली आहे, त्याचा शेवट मराठाच करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.




## 'आरटीओ'चे कामकाज सलग दुसऱ्या दिवशीही ठप्प

अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि.२४) पासून बेमुदत संप सुरु केला आहे. बुधवारी दुसऱ्या दिवशीही संप सुरु राहिल्याने कार्यालयाचे कामकाज पूर्णपणे ठप्प होते. नेहमी गजबजलेल्या नगर आरटीओ कार्यालय परिसरात सर्वत्र शुकशुकाट दिसत होता. (छाया - बबलू शेख)

# महावितरणच्या तुटलेल्या तारेला चिकटल्याने शॉक बसून नगरमध्ये दोघा शाळकरी मुलांचा जागीच मृत्यू

नगर - महावितरणच्या शेतातून गेलेल्या वाहिनीची तार तुटून खाली पडली व या तारेला चिकटून शॉक बसल्याने दोघा शाळकरी मुलांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर कल्याण रोड वरील रेल्वे उड्डाणपूल परिसरात नेप्ती गावच्या शिवारात २४ सप्टेंबरला सायंकाळी घडली.

या दुर्घटनेत आकाश लालू निसाद (वय १२) व घनश्याम राजू मुखीचा (वय १२, दोघे रा. दिनेश हॉटेल पाठीमागे, कल्याण रोड) या दोघांचा मृत्यू झाला असून त्यांच्या बरोबर गेलेला आणखी एक जण सुदैवाने बचावला आहे. दोघे मयत आणि आणखी एक जण असे तिघे जण मंगळवारी (दि.२४) सायंकाळी ४.३० ते ५ च्या सुमारास नेप्ती शिवारात रेल्वे लाईनच्या पुढील बाजूस बायपास रस्त्याच्या जवळ असलेल्या एका बंधाऱ्यावर मासे पकडण्यासाठी गेले होते. त्या बंधाऱ्याजवळून महावितरणची वीजवाहिनी गेलेली आहे. या वाहिनीची एक तार तुटून ती बंधाऱ्याजवळ पडलेली होती. त्या तारेतून बंधाऱ्याच्या पाण्यात वीज प्रवाह उतरलेला होता.

मासे पकडण्यासाठी गेलेल्या तिघांपैकी एक जण पाण्यात उतरताच त्याला विजेचा शॉक बसून तो पाण्यात बुडाला, दुसरा तेथून पाळायला लागला मात्र त्याचा तुटलेल्या तारेला स्पर्श झाल्याने त्यालाही शॉक बसला. त्यामुळे दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. हे पाहून त्यांचा तिसरा साथीदार घाबरून घराकडे पळत आला. त्याने घडलेला प्रकार घरी सांगितल्यावर मयत मुलांच्या नातेवाईकांनी तसेच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

ही माहिती नगर तालुका पोलिसांना मिळताच स.पो.नि. प्रल्हाद गिते यांनी पोलिसांचे पथक पाठविले. महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. या वीज वाहिनीवरील वीज पुरवठा खंडित केल्यानंतर दोन्ही मयत मुलांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास महिला अंमलदार रेपाळे या करीत आहेत.

# दोन दिवसात अतिक्रमण काढा अन्यथा आमरण उपोषणास बसणार

## अधिकारी कोणाच्या दबावाखाली आहेत की लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप आहे? अधिकारी एखाद्याचा मर्डर होण्याची वाट पाहतात का? : अभय आगरकर

नगर - केडगाव उपनगरात काही दिवसांपूर्वी एवढा मोठा वाद होऊनही अद्याप नगर-कल्याण व नगर-पुणे लिंक रोडवरील कामात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणाबाबत प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. प्रशासन एखाद्याचा मर्डर होण्याची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल करत येत्या दोन दिवसात कार्यवाही न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी दिला आहे.



लिंक रोडवरील सदर अतिक्रमणाच्या कारणातून मध्यंतरी मारहाणीची घटना घडली. मात्र त्यानंतरही बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित अतिक्रमणाबाबत कोणतीही कारवाई केली नाही. अधिकाऱ्यांनी त्याबाबत केवळ चालढकल चालवली आहे. त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे की अधिकारीच मॅनेज आहेत? असा सवाल करत ॲड. आगरकर म्हणाले की, सदर रस्त्याचे काम करताना अधिकाऱ्यांनी नियम धाब्यावर बसवले आहेत. एरव्ही रस्ता करताना आधी नालीचे काम केले जाते. येथे मात्र रस्त्याचे काम आधी केले आणि नालीचे काम केलेच नाही. चुकीच्या पद्धतीने अधिकारी काम करत आहेत. ते कोणाच्या दबावाखाली आहेत. त्यात लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप आहे काय? संबंधिताशी अधिकाऱ्यांचे लागेबांधे आहेत का? याबाबत शंका येत आहे. अतिक्रमणाबाबत अधिकाऱ्यांनी याआधी नोटीस का बजावली नाही. याआधी कारवाई केली असती तर केडगावमध्ये वाद झालाच नसता. आता दोन दिवसात कारवाई न झाल्यास भाजपच्या कार्यकर्त्यांसह बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण केले जाईल.










जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

### जिंदगी क्या है?...

आयुष्य कसं असतं ना? आयुष्य स्वतःच्या गतीनं, स्वतःच्या मार्गानं वाहात असतं. तो अदृश्य, अप्राप्य देव, निसर्ग वा आणखी काही म्हणा, त्याच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या आपण!

आयुष्याच्या प्रवासात, महामार्गात भेटणारी माणसंही आपण निवडू शकत नाही. त्यापैकी कोणाला लक्षात ठेवायचं, कोणाला विसरायचं हेही आपल्या हातात नसतं. आपण नुसतं प्राप्त प्रवाहानुसार वाहत राहायचं. तेवढंच आपल्या हाती बाकी काय?

कधी ठरवून काही लक्षात ठेवणं, वा विसरणं माणसाला जमतं का? जमत असतं तर आपला वियोगाचा, दुःखी-कष्टी भूतकाळ विसरून प्रत्येक माणूस सुखी नसता का होऊ शकला असता? म्हणूनच शायर अनुभवातून म्हणतो,


उम्रभर कोनं किसको याद करता है...

वक्तके साथ... खयालात भी बदल जाते है...

मौत मेहबूबा आहेच. तिनं नेण्याअगोदर जो मिळाला त्याचे आभार मामून पुढं चालत राहायचं. बाकी काय आहे? जीवन काय आहे?

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



# नगर शहर परिसरात सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस; सीना नदीच्या पुरामुळे कल्याण रोडवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प

नगर - नगर शहर परिसरात सोमवारी (दि.२३) रात्री पाठोपाठ मंगळवारी (दि.२४) रात्रीही मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे सीना नदीला मोठा पूर आला असून कल्याण रोडवरील पूल पाण्याखाली गेल्याने या रोडवरील वाहतूक ठप्प झाली आहे. त्यामुळे कल्याण रोड परिसरात राहणाऱ्या नागरिकांचा नगर शहराशी संपर्क तुटला असून त्यांना थेट केडगावमार्गे नगर शहरात यावे लागत आहे.

शहर परिसरात शुक्रवारी (दि.२०) रात्री जोरदार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर सोमवारी (दि.२३) सायंकाळनंतर विविध भागात विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटात पाऊस सुरू झाला. नगर शहर परीसराबरोबरच तालुक्यात अनेक भागात या पावसाने जोरदार हजेरी लावली. शहर परिसरात सर्वत्रच मुसळधार पाऊस झाल्याने सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. नागापूर परिसरात तर ढगफुटी सदृश पाऊस कोसळल्याने आणि सावेडी परिसरात पावसाचा जोर जास्त असल्याने सीना नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला होता. या पुरामुळे कल्याण रोडवरील पूल पाण्याखाली गेल्याने या रोडवरील वाहतूक ठप्प झाली होती. मंगळवारी (दि.२४) रात्री पुन्हा शहर परिसराला मुसळधार पावसाने झोडपून काढले.

मंगळवारी रात्रभरात नागापूर मंडलात २२ मिमी, तर चास मंडलात तब्बल ४९.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या शिवाय सावेडी मध्ये ११.३ मिमी, नालेगाव ०.८ मिमी, कापूरवाडी २ मिमी, केडगाव ०.३ मिमी, जेऊर ९ मिमी, चिचोंडी पाटील ३.५ मिमी, वाळकी २.८ मिमी, रुईछत्तीसी २३.८ मिमी, नेप्ती २० मिमी अशी पावसाची नोंद झाली आहे.

### पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी

सलग दोन दिवस सीना नदीला पूर आल्याने कल्याण रोड येथील रस्ता वाहतुकीसाठी बंद आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. कल्याण रोड येथील नागरिकांना काटवण खंडोबा रोड, विठाई लॉन्स येथील पर्यायी रस्ता आहे. मात्र तो ही चिखलमय व खड्डेमय झाला असल्याने नागरिकांना ये जा करण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. महापालिका प्रशासन कल्याण रोडच्या नागरिकांसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी असमर्थ ठरली आहे. महापालिकेने कल्याण रोड येथील नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था तातडीने करून देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



सीना नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने नगर -कल्याण महामार्गावरील वाहतूक ठप्प आहे. या परिसरातील नागरिकांसाठी असलेल्या पर्यायी रस्त्याची ही प्रचंड दुरवस्था झाली आहे.

## चिचोंडी पाटील गावच्या शिवारातील अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

नगर - नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील शिवारातील म्हसोबावाडी येथे सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. घरगुती वापराच्या गॅस टाक्या, रिफिलिंग मशीन, वजन काटा असा २७ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगेश विलास मोरे (रा. म्हसोबावाडी, चिचोंडी पाटील) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलीस अंमलदार शिवाजी ढाकणे यांनी फिर्याद दिली आहे. मंगेश मोरे हा म्हसोबावाडी येथे अवैधरित्या गॅस रिफिलिंग करत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळाली होती. त्यांनी एक पथक तयार करून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. पथकाने पंचासमक्ष सोमवारी (दि.२३) सायंकाळी साडेसातच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला असता मंगेश मोरे हा अवैधरित्या गॅस रिफिलिंग करत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी सर्व मुद्देमाल ताब्यात घेत मोरे विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास नगर तालुका पोलीस करत आहेत.

## थकबाकी व पेन्शन वाढीसाठी एसटीचे सेवानिवृत्त कर्मचारी करणार ७ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन

नगर - राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेने थकबाकी व पेन्शन वाढसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी ७ ऑक्टोबरला राज्यात एल्गार पुकारला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलनात होणार असून, यामध्ये जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सेवानिवृत्त झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांचे देयके महामंडळाकडे थकलेले असून, त्यांना सर्व देयके तात्काळ अदा करावे, शासनस्तरावर ईपीएस ९५ बाबत योग्य तो निर्णय घेऊन पेन्शन वाढपासून वंचित राहिलेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळावा, कामगार करारात मंजूर झालेल्या तरतुदीनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती महामंडळाने करावी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वर्षभरासाठी सर्व प्रकारच्या गाड्यांसाठी मोफत पास मिळावा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन वाढ आणि रजेच्या रोखीकरणाचे पैसे एकरकमी देण्यात यावे अशा विविध मागण्यांसाठी सेवानिवृत्ती कर्मचारी आत्मक्लेश आंदोलन करणार असल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय सदस्य तथा जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे, सचिव गोरख बेळगे, कार्याध्यक्ष अर्जुन बकरे, खजिनदार विठ्ठल देवकर यांनी दिली.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २५ सप्टेंबरला महामंडळाच्या नोटीसनुसार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मुंबई येथे उपमहाव्यवस्थापक यांच्याशी चर्चा करणार आहे. वेतन वाढ आणि रजेच्या रोखीकरणाचे पैसे अद्याप देण्यात आलेले नसून, हा भार अंदाजे तीनशे कोटी रुपयांचा असल्याचे बलभीम कुबडे यांनी सांगितले आहे.

नियमित कर्मचाऱ्यांना नुकतीच २०२० पासून नवीन वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. यादरम्यान निवृत्त झालेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वाढलेली वेतनश्रेणी, महागाई भत्ता आणि घरभाडे अशी जी काही फरकची रक्कम होईल ती एकरकमी मिळावी अशी ही सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांची महत्त्वाची मागणी आहे. केंद्र सरकारची तटपुंजी पेन्शन सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळालेली अल्प अशी रक्कम यात खर्च भागवतांना निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. महागाईच्या काळात त्यांना जीवन जगणे अवघड झाले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### वैदुवाडी येथे युवकाची गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घरी गळफास घेऊन तरूणाने आत्महत्या केल्याची घटना वैदुवाडी येथे सोमवारी (दि.२३) घडली. शैफुल ईस्लाम (वय ३४, रा. वैदुवाडी) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. शैफुल ईस्लाम यांनी घरात गळफास घेतल्याने त्यांना त्यांची पत्नी जरयू मुंण्डा यांनी सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉ. विशाखा शिंदे यांनी त्यांची तपासणी करून ते मयत झाले असल्याचे सांगितले. तशी माहिती त्यांनी रूग्णालयात नेमणूकीस असलेल्या पोलिसांना दिली. त्यांनी दिलेल्या खबरीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## राज्यभरातील उमेद अभियानातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

**मागण्या मान्य होईपर्यंत गाव ते राज्यस्तर आंदोलने करण्याचा इशारा**

नगर - शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानात कार्यरत अधिकारी, कर्मचारी तसेच गावागावात काम करणाऱ्या कर्मचारी महिलांच्या विविध मागण्या प्रलंबित असून त्या सोडविण्यासाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. यामध्ये नगरसह राज्यभरात गुरुवारी (दि.२६) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असून मागण्या मान्य होईपर्यंत गाव ते राज्यस्तर आंदोलने करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

या अभियानाच्या माध्यमातून तब्बल ३००० अधिकारी व कर्मचारी मागील दहा वर्षापासून कंत्राटी स्वरूपाने काम करीत आहेत. सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागील तीन वर्षापासूनच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी शासन दरबारी वेळोवेळी मागणी करण्यात आली होती. परंतु मागणी मान्य न केल्यामुळे दि.१० ते १२ जुलै २०२४ दरम्यान आझाद मैदान मुंबई येथे अधिवेशन कालावधीत आंदोलन करण्यात आले. झालेल्या आंदोलनामध्ये मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांनी मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र तब्बल अडीच महिने होऊनही मागण्या मान्य न झाल्यामुळे उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सर्व महिला, कार्यरत केडर, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवार (दि.२५) पासून पासून गाव स्तरापासून ते राज्य स्तरावर पुन्हा आंदोलन सुरू करत असल्याचा इशारा दिला आहे. त्यासाठी सर्व पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांना निवेदने दिली आहेत.

महाराष्ट्र शासनाकडून राबवण्यात येणारे उमेद अभियान हे महिला स्वयं सहायता समूह (बचत गट) स्थापन करण्यापासून महिलांना व्यवसायात उभे करण्यापर्यंत गावोगावी काम करत आहे. महिलांच्या विविध स्तरावर संस्था स्थापन करून त्या संस्था बळकट करताना महिलांची आर्थिक उन्नती साधून दारिद्र्य निर्मूलनाचे काम मोठ्या प्रमाणत करीत आहे. त्यामुळे उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्याची मागणी उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांबाबत गुरुवारी (दि.२६) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हजारोच्या संख्येने महिला व कर्मचारी आमरण उपोषण संघटनेच्या वतीने करणार आहेत. यामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष स्वप्नील शिर्के व कॅडर संघटनेच्या अध्यक्षा रुपाली नाकाडे यांनी केले आहे.

### अशोकलाल गुंदेचा यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - देवगाव, कुकाणा (ता.नेवासा) येथील रहिवाशी



अशोकलाल भगवानदास गुंदेचा (वय ७४) यांचे २५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर देवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतीश गुंदेचा व दिपाली राजेश गांधी यांचे वडील होत.

### पत्रकार रमेश दास्ताने यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - आश्वी बु।। (ता.संगमनेर) येथील दैनिक नवा मराठा



व इतर वृत्तपत्राचे बातमीदार शामराव उर्फ रमेश श्रीपाद दास्ताने (वय ९६) यांचे २४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर आश्वी बु।। येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ भाऊ, भाऊजया, पुतणे, नातू असा परिवार आहे.

### मिराबाई साठे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील नालेगाव भागातील रोहकले गल्लीत राहणाऱ्या



मिराबाई रामभाऊ साठे (वय ७०) यांचे २० सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गंज बाजारातील भाजी मार्केट येथील भाजीपाला विक्रेते प्रवीण साठे व गणेश साठे यांच्या त्या मातोश्री होत.

### सुभाष झिरंगे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील सुभाष विठ्ठल झिरंगे (वय ६८) यांचे २४



सप्टेंबर रोजी सायंकाळी ६:३० वा. हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुले, सुना, पुतणे, नातू असा परिवार आहे. भाग्योदय पतसंस्थेचे माजी व्हा.चेअरमन चंद्रकांत झिरंगे व अरुण झिरंगे यांचे बंधू, डॉ.संकेत झिरंगे व सुयोग झिरंगे यांचे वडील, आशिष व सौरभ झिरंगे यांचे चुलते होत.

## समाजाला झुलवत ठेवण्याचे राज्य शासनाचे धोरण 'घातक'

**सलग सहाव्या दिवशीही नगरमध्ये मराठा आंदोलकांचे उपोषण सुरूच**

नगर - मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ नगरमध्ये उपोषणास बसलेल्या एका आंदोलकाची प्रकृती खालावल्याने अखेर त्यास मंगळवारी (दि. २४) सायंकाळी सलाईन देत वैद्यकीय उपचार देण्यात आले. तथापि शासकिय उपचार घेण्यास आंदोलकांनी यावेळी नकार दिला.

या उपोषणाचा बुधवारी (दि. २५) सहावा दिवस असून, तत्पूर्वी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी जाऊन उपोषणकर्त्यांची विचारपूस केली. परंतु स्थानिक प्रशासनाच्या हाती याबाबत काहीच नसून शासन याबाबत निर्णय घेणार की नाही याचा अद्यापही अंदाज येत नाही. शासनाला मराठा आरक्षण आंदोलन एकतर मोडीत काढायचे किंवा समाजाला झुलवत ठेवायचे असल्याने शासनाचे सध्याचे धोरण हे 'घातक' असल्याची प्रतिक्रिया उपोषणकर्ते गोरख दळवी यांनी दिली आहे.

मराठी आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या समर्थनार्थ नगरमध्ये गोरख दळवी, संतोष आजबे आणि सखाराम गुंजाळ उपोषणास बसले आहेत. या उपोषणाचा बुधवारी (दि. २५) सहावा दिवस आहे. उपोषणामुळे संतोष आजबे यांची प्रकृती खालावल्याने मराठा तरुणांच्या विनंतीवरून त्यांनी मंगळवारी सायंकाळी सलाईन घेतले. तहलीसदार, प्रांताधिकारी तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी जाऊन त्यांची विचारपूस करत चर्चा केली. तथापि सदर विषय स्थानिक प्रशासनाच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे केवळ आंदोलकांची भूमिका शासनाकडे कळविणे एवढेच केले जात आहे. शासनाकडूनही आंदोलनाच्या मागण्यांबाबत अद्याप काहीच निर्णय झालेला नाही. केवळ झुलवत ठेवणे एवढाच प्रकार सुरू असल्याबाबत दळवी यांनी खेद व्यक्त केला. दरम्यान, मनोज जरांगे यांचे आंदोलन स्थगित झाले असल्याने नगरमधील उपोषणकर्त्यांचे उपोषण बुधवारी सायंकाळनंतर स्थगित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.




नगरमध्ये उपोषणास बसलेले मराठा आंदोलक. (छाया - लहू दळवी)

## विज पुरवठा खंडीत झाल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

नगर - अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेचा विज पुरवठा खंडीत झाल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागाचा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. २४ सप्टेंबर रोजी रात्री ९.१५ वाजलेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने उच्च दाब विज वाहिनीवर विळद घाट परिसरात बिघाड निर्माण झाल्याने शहर पाणी पुरवठा योजनेचा विज पुरवठा खंडीत झालेला होता. विज वितरण कंपनीचे कर्मचारी व मनपाचे कर्मचारी यांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेवून आज पहाटे ३.०५ वाजता पुर्ण केले.

विज पुरवठा सुरू झाल्यानंतर वसंत टेकडी येथे सकाळी ६ वाजता पुर्ण दाबाने पाणी उपसा सुरू झालेला आहे. सलग सहा तास विज पुरवठा बंद राहील्याने शहर पाणी वितरणाच्या टाक्या भरता आलेल्या नाहीत. त्यामुळे २५ सप्टेंबर रोजी पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास पाणी पुरवठा करता आलेला नाही. पाणी पुरवठा न झालेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास २६ सप्टेंबर रोजी पाणी पुरवठा करण्यात येईल. तसेच २५ सप्टेंबर /९/२०२४ रोजी उपनगर भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महानगर पालिकेने केलेले आहे.



'स्नेहबंध' चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सत्कार करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### तारुण्यपिटीकेच्या समस्येपासून मुक्तता

तारुण्यपिटिकेमध्ये पित्त व कफ दोषदृष्टी झालेली असते. याकरिता आरोग्यवर्धिनी वटी तसेच महामंजिष्ठादी काढा दोन वेळेला घ्यावा. त्याच बरोबर रात्री झोपताना त्रिफळा चूर्ण कोमट पाण्यातून घ्यावे. तारुण्यपिटिका जर जीर्ण झाल्या असतील तर गंधक रसायन सुरू करावे. मड पॅक, निम पत्र पावडर, चंदन पावडर, मंजिष्ठा पावडर हे सर्व गुलाब पाण्यामध्ये मिक्स करावे व त्याचा लेप चेहऱ्याला लावावा.

## पाककला

### सँडविच टोस्ट

**साहित्य :** उकडून घेतलेल्या बटाट्याच्या बारीक फोडी एक वाटी, चिरलेला कांदा अर्धी वाटी, तीन-चार ओल्या मिरच्या, मीठ, साखर, कोथिंबीर, पाव वाटी गोड सायीचे दही, अर्धी वाटी तूप.

**कृती :** बटाट्याच्या फोडी कुस्करून घ्याव्या. मिरच्यांचे बारीक तुकडे करून घ्यावेत. एका पातेल्यात दोन-तीन चमचे तूप घालून, त्यात मिरच्यांचे तुकडे आणि चिरलेला कांदा घालून एक वाफ द्यावी. नंतर त्यात कुस्करलेला बटाटा व चवीप्रमाणे मीठ व साखर घालून ढवळावे व खाली उतरवून ठेवावे. गार झाल्यावर त्यात दही व कोथिंबीर घालावी. नंतर पावाच्या दोन स्लाइस घेऊन त्यांमध्ये वरील तयार केलेले भाजीचे सारण (साधारणपणे स्लाइसच्या जाडीइतके) घालून सँडविच टोस्ट करण्याच्या साच्यात घालून भाजून घ्यावे.

## वास्तू

### मास्टरबेडरुम संबंधी

* गृहरचनेनुसार ईशान्य दिशेत मास्टर बेडरूम असेल तर त्या घराचा दिवाणखाना दक्षिण, पश्चिम भागात असण्याची शक्यता अधिक असते. अशा वेळी गृहस्वामी व स्वामिनीने या दक्षिण-पश्चिम दिशेतच झोपावे व देवघर ईशान्येत स्थापन करावे.

## सल्ला

दुधी भोपळ्याच्या अगर केळ्याच्या साली आपण टाकून देतो. त्याऐवजी त्या चिरून त्यात वालाची डाळ घालून भाजी करावी.

## सौंदर्य

दुधाने आंघोळ केल्याने त्वचा मुलायम होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४

**गुरुपुष्यामृत, दशमी श्राद्ध, हस्त रवी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, पुनर्वसु २३।३४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

**वृषभ :** कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो.

**मिथुन :** आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. शत्रूंपासून सावध राहा. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क :** व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगाल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**कन्या :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**सिंह :** शत्रूंपासून सावध राहाल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल. मागील उधारी वसुल होईल.

**तूळ :** कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. मुले त्रास देऊ शकतात.

**वृश्चिक :** आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. आजचा दिवस छान जाईल.

**धनु :** आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा.

**मकर :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**कुंभ :** काळजीपूर्वक कार्य करा. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. छोट्या-छोट्या अडचणी येतील.

**मीन :** ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. घरगुती बाबतीत अधीरता असेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## पथ्य

'तुम्ही चहा पिता' - 'नाही'
'तंबाखू, पान खाता ?' - 'नाही.'
'बाहेरचं अबर चबर खाता ?'
- 'बिलकुल नाही. '
'तुम्हाला सांगायला एकही पथ्य माझ्या जवळ नाही,
तर तुम्ही बरे होणार तरी कसे?' डॉक्टरांनी विचारलं.

# ...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* महाराष्ट्रात या विभागात जास्त जिल्हे आहेत - संभाजीनगर
* बडीद येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष - लक्ष्मीकांत देशमुख
* भारताच्या पंतप्रधानांचे शासकीय निवासस्थान - ७, लोककल्याण मार्ग
* व्हेलेंटाईन डे या दिवशी साजरा करतात - १४ फेब्रुवारी

**संदर्भ - 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०१८

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | |
| ७ | | | | | ■ | | ■ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | | १० |
| ■ | ११ | | ■ | १२ | ■ | ■ | |
| १३ | | ■ | १४ | | १५ | १६ | |
| १७ | | १८ | | ■ | १९ | | ■ |
| | ■ | २० | | ■ | ■ | ■ | २१ |
| २२ | | ■ | २३ | | | | |

**आडवे शब्द :** १) एक दुचाकी वाहन ५) प्रयोजन; सबब; निमित्त ७) ओकारी येईल असे ८) स्त्रियांचे एक बाहुभूषण ९) टीम; चमू; टोळी ११) बांबू १३) ताडकन फुटणारी एक वस्तू १४) प्रतिष्ठा; आव; प्रस्थ १७) कबर; थडगे; समाधी १९) एक पक्षी; वायस; कावळा; काग २०) लज्जा; शरम; हया २२) रमणीय; सुंदर; छान २३) पक्षी किंवा लहान मुलांचा गलबला

**उभे शब्द :** १) सावट; छाया २) मृत्युदेव ३) दयाळू; ममताळू ४) चकाकी; तेज ६) आपले अन्न एकदा सरासरी चावून गिळल्यानंतर पुन्हा ते तोंडात आणून चघळण्याचा जनावरांचा उद्योग १०) थडगे; समाधी ११) वेचून काढलेले; मोजके १२) आघात; वार; जखम १३) कारखान्यात वस्तू उत्पादनाचे काम करणारा १४) गोंधळाची अवस्था; बेबंदशाही १५) नौबत; मोठा नगारा १६) एक पक्षी; बगळा १८) अरिष्ट; संकट; आपत्ती २१) मार्ग; रस्ता; पथ

### शब्दगंध क्र. ७०१७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | द | र | सा | ■ | पा | स | री |
| त | ळ | ■ | वि | ना | य | क | ■ |
| ■ | ■ | मं | श्री | ■ | स | वा | ल |
| द | ब | द | बा | ■ | ■ | र | मा |
| हा | ट | ■ | ई | थ | र | ■ | ण |
| ■ | व | ■ | फु | र | स | त | ■ |
| वे | डा | ■ | ले | ■ | म | ■ | झे |
| स | ■ | | ■ | सा | य | क | ल |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** स्वभावातील गोडीने आणि जिभेवरील माधुर्याने माणसे जोडली जातात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## सर्वात लांब उडी मारणारा प्राणी कोणता?

लांबच लांब उडी मारण्याबद्दल कांगारू या प्राण्याची प्रसिद्धी आहे. काही जातींची हरणे संकटकाळी पळताना लांब उड्या मारत असली तरी नेहमीच्या त्यांच्या पळण्यात किंवा चालण्यात उडीचा समावेश नसतो. कांगारू, वालाबी, कांगारुसमउंदीर हे तीन प्राणीच नेहमी चालताना उड्या मारत चालतात. याचे कारण त्यांच्या शरीराची रचना. या प्राण्यांचे मागचे पाय खूप लांब असतात तर पुढचे पाय खूप आखूड असतात. याशिवाय त्यांचं शेपूट बळकट असतं. या शेपटाचा बसताना आधार व उडी मारताना तोल सांभाळण्यासाठी उपयोग होतो.

कांगारू हे प्राण्यांच्या शिशुधानी प्रकारात मोडतात. या शिशुधान वर्गीय प्राण्यांना आपली बालके सांभाळण्यासाठी पोटाला एक पिशवी असते. नुकतेच जन्मलेले बालक या पिशवीत सुरक्षित असते. हे शिशुधानी प्राणी ऑस्ट्रेलियात आढळतात. यातल्या कांगारूची उडी मात्र जगप्रसिद्ध आहे. पावणे दोन ते दोन मीटर उंचीचे कांगारू बसल्या जागेवरून टुणकन ५ ते ७ मीटर लांब उडी मारते. अशा उड्या मारत कांगारू ताशी ९० कि.मी. वेगानं पळते. पळणाऱ्या कांगारूची एक एक उडी कधी कधी १०-११ मीटरचीही असू शकते.

असा हा उडी मारणारा प्राणी स्वभावानं गरीब असला तरी चिडला तर आपल्या मागच्या पायाच्या फटक्यात शिकारी कुत्रा मारतो किंवा त्याची लाथ बसली तर माणूसही मरू शकतो.

## गुण आणि दोष

एका गावात एक चित्रकार राहत होता. त्याने एका मोठ्या चित्रकाराकडे चित्रकलेचे शिक्षण घेतले होते. त्याची चित्रे चांगली असतात, असे सारे जण सांगत असत.

त्या लोकांना आपल्या चित्राबद्दल नेमके काय वाटते, आपल्या चित्रात कोणते दोष असतात हे समजून घेण्यासाठी त्याने एक अभिनव शक्कल शोधून काढली. चित्रकाराने आपले एक सुंदर चित्र गावातल्या मध्यवर्ती चौकात लावले. आणि त्या चित्राखाली लिहिले, 'या चित्रातील दोष दाखवा.' संध्याकाळी तो चित्रकार त्या चौकात गेला तर चकित झाला. त्या सुंदरशा चित्रावर असंख्य सूचना लिहिलेल्या होत्या, त्या चित्रातले अनेक दोष दाखवले होते. त्यामुळे तो चित्रकार खूप नाराज झाला. आपण स्वतःला उगाचच चांगला चित्रकार समजत होतो असे त्याला वाटू लागले.

निराश मनाने तो आपल्या गुरुजींकडे गेला आणि म्हणाला, 'तुम्ही मला चित्रकला शिकविली. अनेक वर्षे कष्ट घेतल्यानंतर चांगला चित्रकार झालो आहे हेही सांगितले. पण बघा, लोकांनी माझ्या चित्रात किती दोष दाखवले आहेत ते!'

गुरुजी हसून म्हणाले, 'मला माहीत होते की असेच होईल. आता मी सांगतो तसे कर, तू तुझे आणखी एक चित्र चौकात लाव व सूचना लिही, 'या चित्रातील चांगल्या गोष्टी कोणत्या? चित्रातील कौतुकास्पद गोष्टी कोणत्या ते लिहा. '

त्या चित्रकाराने तसेच केले. सायंकाळी चौकात गेला तर त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. चित्रावर फक्त २-४ सूचना होत्या. मोजक्याच लोकांनी चित्राला चांगले म्हटले होते. ते चित्र घेऊन तो चित्रकार जेव्हा गुरुजींकडे आला, तेव्हा गुरुजी त्याला म्हणाले, 'हे असेच असते! एखाद्या गोष्टीत दोष दाखवायचे म्हटल्यास अनेक लोक पुढे येतात. पण एखाद्याला चांगले म्हणायला, त्याच्यातल्या गुणांची कदर करायला २-४ लोकच पुढे येतात. तेव्हा निराश न होता माणसाने आपले काम करावे.

तात्पर्य : दुसऱ्यातील चांगले गुण न घेता लोक त्याच्यातील असंख्य दोष निर्दशनास आणून देतात.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



## २. जीवन की रोशनी

अर्थात् आत्मा शब्द के साथ लगकर बिना आँखों से देखना, बिना बाहरी कानों के प्रभु की आवाज़ को सुनना, बिना हाथों-पैरों से इसके साथ लगना और बिना बाहरी पैरों की सहायता से परमात्मा की तरफ चलना शुरू कर देती है। महापुरुष आगे और वर्णन करते हुए बताते हैं कि देखने वाली आँखें उस सचाई को देखती नहीं परन्तु गुरु की बख्शिश से मनुष्य परम ात्मा की ताकत को आमने-सामने देखने लग जाता है। इसी कारण एक गुरुमुख शिष्य परमात्मा को सभी दिशाओं में देख सकता है। हमारी इन्द्रियों की बनावट ऐसी है कि इस भौतिक दुनिया में देखती हैं और वह भी अधूरी लेकिन पिण्ड से ऊपर के स्तर को समझने में ये बिल्कुल असफल रहती हैं।

देख कर हम देखते हैं, परन्तु जानते नहीं । सुनकर हम सुनते हैं परन्तु समझते नहीं। हमारा एक दिल है परन्तु भावनाओं और ज्ञान से खाली है। (बाईबल)

परन्तु यह एक पूर्ण और आश्चर्यजनक परिवर्तन तब ही आता है जब मनुष्य असली तौर पर सुरत को उलट कर जीते जी मरना सीखता है। इसी लिए कहा गया है:-

मरना सीख ताकि तू सदा के जीवन को पा सके। वह जीवन जो स्वतंत्र बेखौफ जीवित आत्मा का जीवन है, जो शारीरिक कोषों को सीमित करने वाली सीमाओं से स्वतंत्र है। इसलिए मनुष्य को आत्मिक उन्नति के लिए देह-ध्यास से ऊपर उठना पड़ता है। माँस (शरीर) को आत्मा से ज्यादा प्यार न कर । गैलिली के पैगम्बर का सनातन मशवरा है ।

जब तक हम इस शरीर रूपी मकान में आत्मिक तौर पर हाज़र रहते हैं, तब तक प्रभु की ओर से गैर हाज़र होते हैं। इन्सान जितना-जितना अपने शरीर की ओर से हटता जाता है प्रभु के निकट होता जाता है।

उत्पत्ति की तुलना इसके कर्ता (प्रभु) के साथ नहीं की जा सकती क्योंकि कौन सी चीज़ है जिस में प्रभु नहीं है। चेतनता का पिंड से हटना (जिसे आम तौर पर मौत कहा जाता है) और रूहानी देश के साथ जुड़ना (जिसे दूसरा जन्म या आत्मा का जन्म कहा जाता है) अर्थात् शरीर के अन्तर बह रही गुरु ताकत (नाम) के साथ लग जाने से जीव फिर कभी नहीं मरता ।

जब सब तेरा साथ छोड़ जाएंगे मैं तुझे नहीं छोड़ूंगा और न ही तुझे मरने दूंगा। (बाईबल) जो इस पर नियंत्रण पा लेता है (पिण्ड से ऊपर आ जाता है) उसे दूसरी बार नहीं मरना पडेगा क्योंकि यदि तुम आत्मा के पीछे चलते हो तुम बार-बार जन्म लेने के कर्म सिद्धान्त से बाहर निकल जाते हो। (बाईबल)

यह सब केवल सिद्धान्त मात्र ही नहीं बल्कि एक सचाई है। यह जीवन की सचाई है क्योंकि जीवन की ज्योति मनुष्य जन्म लेने के समय से ही उसके साथ चलती है और हर मनुष्य को इस संगीतमय ज्योति और प्रभु के गुप्त भेदों को जान सकने का अधिकार दिया गया है। (बाईबल)

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र

## २. अपने आप से प्रेम करना

किसी भी स्वस्थ रूप से काम करनेवाले परिवार में स्वाभिमान को सार मूल्य माना जाना चाहिए।

उद्देश्य : हमें परिवार के प्रत्येक सदस्य की विशेषताओं को सामने लाना है (अ) प्रत्येक अपने बारे में क्या जानता है।

(ब) दूसरे उसके बारे में क्या जानते हैं और क्या मान्यता देते हैं।

(स) हर व्यक्ति अपनी खूबी और प्रतिभा के बारे में क्या सोचता है।

अवधि: २ घंटे ३० मिनट

सामग्री : फ्लिप चार्ट पेपर, मास्किंग टेप, मार्कर्स, धारीदार कागज व पेंसिल, क्रेयॉन, रंगीन पत्रिकाएँ, कैंची, पेस्ट, गोंद, पुस्तक के पहले भाग से 'सम्मान' से जुड़ी व्याख्या ।

१. एक साथ काम करना

१.१ मानसिक चित्रण

(धीमे शब्दों में धीरे-धीरे पढ़ें) मौन भाव से मानसिक चित्रण करें कि आप अपने प्रिय स्थान पर संसार में कहीं भी बैठे हैं अपने आसपास के वातावरण का आनंद ले रहे हैं। अचानक आप देखते हैं कि दूर से आप दिखाई दे रहे हैं और आपका प्रसन्नचित्त रूप बड़े ही स्नेह से चलता हुआ आपके पास आने लगता है, उसका चेहरा बहुत ही शांत व संतुष्ट दिख रहा है, आप बहुत सुंदर और जीवंत दिख रहे हैं। आप अपने आपको देखकर प्रशंसा करते हैं, आप कौन सी विशेषताएँ देखते हैं? आपको कौन सी विशेष प्रतिभा दिखती है? अपने आपको देखने का आनंद लें, अगर आपको अवसर मिले तो आप इसके अतिरिक्त और क्या हो सकते हैं या बन सकते हैं? अपने आपको देखने का आनंद लें, अपने अनूठेपन को अनुभव करें, आप बहुत ही अनमोल और मूल्यवान् हैं, अब धीरे-धीरे अपनी चेतना को कक्ष तक लाएँ इस कक्ष में लाएँ, जो आपके सहित तथा आपके अपने विशेष परिवार सहित बहुत सारे अच्छे व खास लोगों से भरा है।

१.२ एक सेल्फ पोस्टर तैयार करें।
(२०-२५ मिनट)

अपने पास रखी पत्रिकाओं में से कोई तीन तसवीरें या प्रतीक छाँटें। वे बताते हैं कि आप अपना मानसिक चित्रण किस रूप में करते हैं। जब आप ऐसा करें तो मानसिक चित्रण के दौरान बनाई गई भावनाओं को बनाए रखें। तसवीरों को काट कर कर बॉण्ड पेपर के बीच चिपका दें। यह आपका अपना पोस्टर तैयार हो गया है। १.३ आपने जो भी कोलाज बनाया है, उसके बारे में इन प्रश्नों के उत्तर देते हुए कुछ लिखें-

समूह - आप अपने बारे में क्या जानते हैं। (इसे शीट पर पहले लिखें) । दूसरे आपके बारे में क्या जानते हैं? (शीट पर दाईं ओर लिखें) आपको अपनी कौन सी खूबियों व संभावनाओं का अनुमान है? (बाईं ओर) जब ये पोस्टर तैयार हो जाएँ तो इन्हें एक ओर रखें और पूरा परिवार फिर से में आ जाए। (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

## मधुमेह : जीवनशैली व आहार

मालतीकाकू बऱ्याच दिवसांपासून माझ्या पेशंट आहेत. एकदा असेच त्या दवाखान्यात माझ्याकडे तपासणीसाठी आल्या व गंभीर चेहरा करून म्हणाल्या, ''अहो! मॅडम नेहमीचाच त्रास होतोय! त्या त्रासापासून माझी सुटका नाही. मालती काकूंना ना वारंवार योनीभागी जंतुसंसर्ग होऊन खाज व सूज येत असे. मी त्यांना कायम रक्त-लघवी तपासून घेऊ म्हणत असे; परंतु औषधे घेतल्यानंतर लगेच बरे वाटते, म्हणून त्या तपासणी करण्याचे टाळत असत. वारंवार होणारा जंतुसंसर्ग पाहून मी त्यांना म्हणाले, ''आज मी प्रथम तुमची रक्त-लघवी तपासणार आणि त्यानंतरच औषधोपचार करणार.'' तपासणी केल्यानंतर मालतीकाकूच्या रक्तामध्ये व लघवीमध्ये साखरेचे प्रमाण जास्त आढळले. मालतीकाडूंना रिपोर्ट बघून धक्काच बसला. त्या मला म्हणाल्या, ''मॅडम, मी फक्त चहाच पिते. इतर काहीही गोड खात नाही. मग मला मधुमेह कशामुळे झाला?'' हे ऐकून मी म्हणाले, ''आता चहासुद्धा नको; कारण त्यामुळे तुमची साखर अजून वाढणार. मी तुम्हाला मधुमेह म्हणजे काय व त्यामध्ये योग्य जीवनशैली व आहार कसा असावा हे समजावून सांगते.''

**मधुमेहाची व्याख्या :** आपण घेतलेल्या आहाराचे पचनानंतर साखरेत रूपांतर होते. शरीरातील असंख्य पेशी, स्नायू शरीराच्या कामासाठी साखरेचा वापर करतात. इन्सुलिनच्या अकार्यक्षमतेमुळे ही साखर शरीरातील पेशी वापरू शकत नाहीत. न वापरलेली साखर शरीरात तशीच पडून राहते. यालाच मधुमेह म्हणतात.

**मधुमेहाचे प्रकार :** मधुमेहाचे दोन प्रकार आहेत : १) स्वादुपिंडात (Pancreas) इन्सुलिन निर्माण होत नाही. २) शरीरात इन्सुलिन कमी प्रमाणात तयार होते. (Insulin Resistance) त्यामुळे साखर वाढते.

**मधुमेहाची कारणे :** अनुवंशिकता हे मधुमेहाचे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, चुकीचा आहारविहार, कष्टाच्या कामांची कमतरता, व्हायरस इन्फेक्शन आणि मानसिक ताण इत्यादी मधुमेह होण्याला कारणीभूत असतात.

**मधुमेहाची लक्षणे :** १) रुग्ण लठ्ठ दिसतात. मात्र अशक्तपणा जाणवतो. २) वारंवार तहान लागते. ३) रात्री झोपेतून लघवीसाठी दोन-तीन वेळेस उठावे लागते. ४) तोंडाला दुर्गंधी येते. ५) जखमा लवकर बऱ्या होत नाहीत. ६) हातापायांची आग होते. ७) जननेंद्रियास वारंवार जंतुसंसर्ग होतो.

**मधुमेह कधी होतो?** मधुमेह बाल्यावस्था ते वृद्धावस्थेपर्यंत केव्हाही होऊ शकतो. गर्भारपणात काही स्त्रियांना तात्पुरता मधुमेह होऊ शकतो. गर्भवती स्त्रीच्या शरारीतील हार्मोन्समध्ये अनेक बदल होतात. त्यामुळे त्यांचे स्वादुपिंड शरीराला जेवढी गरज आहे, तेवढ्या प्रमाणात इन्सुलिन तयार करू शकत नाहीत. रक्तामध्ये भरपूर प्रमाणात साखर तयार होते व यालाच गर्भावस्थेतील मधुमेह असे म्हणतात. बाळंतपणानंतर हा कमी होतो. ज्यांच्या कुटुंबामध्ये मधुमेहाचा इतिहास आहे, ज्या स्त्रिया स्थूल आहेत, अशांना हा मधुमेह होऊ शकतो. त्यासाठी गर्भारपणात प्रत्येक महिन्याला रक्तातील साखरेची तपासणी करून घ्यावी. अशा अवस्थेत वैद्यकीय उपचार व्यवस्थित घेतले नाही तर गंभीर समस्या निर्माण होऊन, गर्भवती स्त्रीच्या व बाळाच्या जीविताला धोका पोहोचू शकतो.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी अहमदनगर महापालिकेचे 'AMC OFFICIAL' व्हॉटस् अॅप चॅनल

### चॅनलमुळे नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी मदत होईल : शुभारंभप्रसंगी आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

नगर – महापालिकेच्या माध्यमातून नगरकरांना सुख सुविधा देण्याचे काम करत असून मनपा आणि नागरिक यांच्यामधील संवाद वाढून अंतर कमी करण्यासाठी मनपाच्या वतीने एएमसी ऑफिशियल व्हाट्सअॅप चैनल सुरू करण्यात आले आहे या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी मदत होईल तसेच मनपाच्या वतीने राबविण्यात येत असलेले उपक्रम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होईल, असे प्रतिपादन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने एएमसी ऑफिशियल व्हाट्सअॅप चॅनलचा शुभारंभ करताना आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी)

अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने एएमसी ऑफिशियल व्हाट्सअॅप चॅनलचा शुभारंभ आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाला. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, प्रियंका शिंदे, निखिल फराटे, सहायक आयुक्त मेहेर लहारे, मुख्य लेखाधिकारी सचिन धस, मुख्य लेखापरिक्षक विशाल पवार, आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता श्रीकांत निंबाळकर, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजान, डॉ.सतीश राजूरकर, अग्निशमन विभाग प्रमुख शंकर मिसाळ, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, प्रभाग अधिकारी नानासाहेब गोसावी, राकेश कोतकर, श्याम गोडळकर, विद्युत विभाग प्रमुख जयेश कोके, मनपा शिक्षण विभागाचे जुबेर पठाण, कामगार विभागाचे क्षेत्रे, स्टोअर विभाग प्रमुख अशोक जाधव, संगणक विभाग शेखर बनकर आदी उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे पुढे म्हणाले की, महानगरपालिका हद्दीमधील नागरिकांसाठी विविध प्रकारचे विकास कामे केली जातात. सदर कामाची, सेवांची व उपक्रमा बाबतची माहिती नागरिकांना समजण्यासाठी विविध समाज माध्यमांचा उपयोग करण्यात येतो. या मध्ये वृत्तपत्र, Radio, TV Channels, Official Website, Facebook, Instagram, Twitter, Youtube Channel इ. चा वापर करण्यात येत आहे. परंतु आज प्रत्येक व्यक्तीकडे Mobile असुन त्या मध्ये सर्वात प्रभावी माध्यम म्हणुन Whatsapp वापरण्यात येत आहे. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे नागरिकांच्या सोयीकरिता व लवकरात लवकर नागरिकांशी संवाद साधण्यासाठी AMC OFFICIAL अहमदनगर महानगरपालिका हे Whatsapp Channel चालु करण्यात येत आहे.

महानगरपालिका व शहरातील महत्वपुर्ण माहिती, आवाहने, सुचना, नागरी सेवा आणि इतर गोष्टीच्या ताज्या updates मिळवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या channel bm follow करावे, AMC OFFICIAL अहमदनगर महानगरपालिका Whatsapp Channel Follow करण्यासाठी नागरिकांनी महानगरपालिके तर्फे प्रसिद्ध केलेल्या QR code scan करून follow करावे किंवा विविध ई माध्यमांवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या link वर click करुन follow करावे व आपल्या Whatsapp मधील updates option द्वारे अहमदनगर महानगरपालिकेशी Connect राहावे असे नागरिकांना आवाहन करीत आहे.

यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी प्रास्तविक करीत असताना सांगितले की, आयुक्त यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेमध्ये विविध स्वरूपाच्या सेवा नागरिकांना देण्याच्या दृष्टीने पहिल्या दिवसापासुन कामाला सुरुवात केलेली आहे. आयुक्त डांगे हे स्वतः दिवस रात्र शहरात फिरुन व स्वतः काम करून कर्मचारी वर्गास प्रोत्साहन देत असतात. त्याचाच एक भाग E-Governance अंतर्गत नागरिकांना सेवा देण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. सार्वजनीक गणेश मंडळांना मंडप परवानगी घेणे करिता Online सुविधा उपलब्ध करुन दिली, त्यामध्ये साधारण ३५० मंडळांनी लाभ घेतला. नागरिकांना तक्रारी करिता Nagar mSeva Mobile App उपलब्ध करून दिले.

महानगरपालिका राबवित असणारे प्रत्येक उपक्रम नागरिकांना समजावे या करिता विविध समाज माध्यमांचा वापर चालु करण्यात आला आहे. सद्य स्थितीत Whatsapp चा मोठ्या प्रमाणावरील वापर विचारात घेता आयुक्त डांगे यांच्या संकल्पनेतुन महानगरपालिकेचे Whatsapp Channel सुरु करण्यात आले आहे असे मुंडे यांनी सांगितले.



जिल्हा क्रीडाधिकारी व महानगरपालिका यांचे वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बास्केट बॉल स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला व या संघाची पुणे विभागीय पातळीवर निवड झाल्याबद्दल शालेय समिती चेअरमन अॅड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

## जिल्हास्तरीय बास्केट बॉल स्पर्धेत 'समर्थ विद्या' विभागीय पातळीवर

नगर – जिल्हा क्रीडाधिकारी व महानगरपालिका यांचे वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बास्केट बॉल स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने दैदिप्यमान खेळ करत प्रथम क्रमांक मिळविला आहे. या संघाची पुणे विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

संघातील खेळाडू संजय शिनगारे, (कॅप्टन), सिद्धांत कुलथे, प्रसाद भिडे, हर्षवर्धन भवार, आदीत्य भवार, श्लोक कंठाळे, सोहम वेळापूरे, सोहम भोसले, सोहम गायकवाड, साईराज वांढेकर, हर्षल फाटके, अथर्व मिसाळ.

वरील सर्व खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख पोपट लोंढे तसेच विजय शिनगारे व सचिन भापकर यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले.

उज्वल यश संपादन करणाऱ्या खेळाडूंना संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे तसेच शालेय समिती चेअरमन अॅड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे, अरुण राशिनकर, संकेत शिंदे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## मोफत अत्याधुनिक कॉम्प्युटद्वारे २७ सप्टेंबरला डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

नगर – जामखेड येथे स्व. सुंदरबाई कन्हैय्यालाल शिंगवी सेवाभावी प्रतिष्ठान आदर्शऋषीजी महाराजसाब यांच्या आशिर्वादाने व आनंदऋषीजी नेत्रालय, व शिंगवी चष्माघर यांच्या संयुक्त विद्यमाने २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शिबीराचे अत्यंत अल्प दरात लेन्स टाकून शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया सह, कॉर्निया, टेरिझम, रेटिना व नेत्ररोग या सर्व तपासण्या व शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांचे मोतीबिंदू, तिरळेपणा, पापणी लवणे या देखील शस्त्रक्रिया महात्मा जन आरोग्ययोजना द्वारे मोफत केल्या जातील. मधुमेह रुग्णांसाठी मागील पडदा (रेटिना) याचीहि शस्त्रक्रिया केली जाईल.

शिबीरातील उपलब्ध सुविधा मोफत ऑपरेशन करुन अल्प दरात लेन्स बसविण्यात येतील. मोफत औषधोपचार, काळा चष्मा, जामखेड ते अहमदनगर येण्या-जाण्याची मोफत सोय, राहण्याची व जेवणाची सोय, आधारकार्ड किंवा रेशनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स, चालु औषधे व गोळ्या बरोबर आणाव्यात असे ट्रस्टचे सचिव अभय शिंगवी यांनी सांगितले. ऑपरेशन झाल्यानंतर सव्वा महिनापर्यंत मोफत तपासणी केली जाईल.

तरी गरजूंना याचा लाभ घ्यावा. नांव नोंदणी आवश्यक आहे. नांव नोंदणी शिंगवी चष्माघर, जुना कापड बाजार, महाप्रभुजी मार्ग, अहमदनगर (मो.नं. ९२८४०५८८५९) व शिंगवी चष्माघर, मेनरोड, जामखेड (फो.नं. ९२२६१२२०६१) येथे करावी असे शिंगवी चष्माघरचे संचालक अजित शिंगवी यांनी सांगितले.

## मराठा सेवा संघाच्यावतीने प्राचार्य देवढे, रजनी गोंदकर, स्व.कैलास गिरवले यांना जीवन गौरव तर भाऊसाहेब जंजिरे, अॅड.जयंत जाधव यांना युवा उद्योजक पुरस्कार



नगर –अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघ व अहमदनगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल शेवगाव येथील प्राचार्य शिवश्री शिवाजीराव देवढे, सामाजिक कार्याबद्दल शिर्डी येथील शिवमती रजनी गोंदकर यांना जीवन गौरव पुरस्कार तर स्वर्गीय कैलासमामा गिरवले यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाले आहेत.

तसेच यावर्षीपासून उद्योग क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या युवा उद्योजकांना सन्मानित करण्यात येणार आहे. कर्जत तालुक्यातील उद्योजक भाऊसाहेब जंजिरे व नगर शहरातील उद्योजक अॅड. जयंत जाधव यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री इंजी. सुरेशराव इथापे व मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय मार्गदर्शक व मराठा पतसंस्थेचे संस्थापक व विद्यमान अध्यक्ष शिवश्री इंजी. विजयकुमार ठुबे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना उपाध्यक्ष शिवश्री किशोर मरकड म्हणाले की, मराठा सेवा संघ व मराठा पतसंस्थेच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, गुलमोहर रोड, अहमदनगर येथे गौरव सोहळा होणार असून यामध्ये समाजातील विविध पदावर निवड झालेल्या तसेच पदोन्नती मिळवलेल्या, सांस्कृतिक, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व दहावी आणि बारावीमध्ये ७० टक्के पेक्षा जास्त मार्क मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सेवानिवृत्त जिल्हाधिकारी शिवश्री तुकाराम कासार व शिवव्याख्याते प्रा. श्रीमंत कोकाटे हे उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विजयकुमार ठुबे हे राहणार आहेत.

गेले सात वर्षापासून असे पुरस्कार सुरू करण्यात आले आहे. या कार्यक्रमानंतर मराठा पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा होणार असून याही सभेस सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन संचालक मंडळाने केले आहे.

## फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल स्पर्धेत आठरे पाटील, प्रवरा पब्लिक आणि आर्मी स्कूलच्या संघांची आघाडी

### गुरुवारपासून रंगणार १७ वर्षाखालील मुलींचे सामने

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (दि.२४ सप्टेंबर) फुटबॉलचे थरारक सामने पार पडले. १२, १४ व १६ वर्ष वयोगटात सुरु असलेल्या या स्पर्धेत आठरे पाटील, प्रवरा पब्लिक, आर्मी स्कूलच्या संघाने गुणांची कमाई करुन आघाडी घेतली आहे. तर गुरुवार पासून १७ वर्षा खालील मुलींच्या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे.

मंगळवारी १४ वर्ष वयोगटात झालेल्या ऊर्जा गुरुकुल विरुध्द आर्मी पब्लिक स्कूल (एपीस) यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलचे खेळाडू आदर्श साबळे व प्रतिक शेळके यांनी प्रत्येकी १ गोल केले. या सामन्यात ०-२ गोलने आर्मी पब्लिक स्कूलचा संघ विजयी झाला.



श्री साई स्कूल विरुध्द तक्षिला यांच्यात झालेल्या रंगतदार सामन्यात ०-५ गोलने तक्षिला स्कूलच्या संघाने दणदणीत विजय मिळवला.

श्री साई स्कूल विरुध्द तक्षिला यांच्यात झालेल्या सामन्यात तक्षिला स्कूलच्या खेळाडूंनी सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रम खेळी करुन एकापाठोपाठ ५ गोल केले. यामध्ये गौरव याने २, तर प्रितम देव, राजवीर, चिरायू यांनी प्रत्येकी १ गोल केला. ०-५ गोलने तक्षिला स्कूलच्या संघाने दणदणीत विजय मिळवला.

आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात आठरे पाटील स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. आठरे पाटीलचे इंद्रजीत गायकवाड व अशोक चांद या खेळाडूंनी दमदार खेळी करुन प्रत्येकी ३ गोल करुन विजय निश्चित केला. तर पवन कानडे, ओम लोखंडे, आदित्य सिंग यांनी प्रत्येकी १ गोल केला. ९-० गोलने आठरे पाटील पब्लिक स्कूलने एकतर्फी विजय मिळवला.

डॉन बॉस्को विरुध्द सॅक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात सॅक्रेड हार्ट कॉन्व्हेंटच्या संघाने तब्बल ९ गोल करुन ०-९ गोलने एकतर्फी विजय मिळवला. सॅक्रेड हार्ट कॉन्व्हेंट कडून जोएल साठा याने ४ तर माहीर गुंदेचा, असद तांबोळी, अंशुमन विधाते, फुरकान शेख, दर्शन या खेळाडूंनी प्रत्येकी १ गोल केला.

१६ वर्ष वयोगटात झालेल्या डॉन बॉस्को विरुध्द श्री साई स्कूलच्या सामन्यात डॉन बॉस्को संघाने ३ गोल करुन ३-० गोलने विजय मिळवला. प्रतिक जाधव याने १ व वेदांत कस्तोरिया याने २ गोल केले.

फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेतील संघांची गुणांकन नुसार असलेली आघाडी पुढील प्रमाणे:-

१२ वर्ष वयोगट अ ग्रुप- प्रवरा पब्लिक स्कूल (९), आर्मी स्कूल (३),

ब ग्रुप- आठरे पाटील (६), तक्षिला (३).

१४ वर्ष वयोगट अ ग्रुप- आठरे पाटील (६ गोलनुसार आघाडी), सक्रेड हार्ट कॉन्व्हेंट (३),

ब ग्रुप- आर्मी स्कूल (९), सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट (३).

१६ वर्ष वयोगट अ ग्रुप- आर्मी स्कूल (६), ओएॅसीस (०),

ब ग्रुप- आठरे पाटील (६), अशोकभाऊ फिरोदिया (७).

### गुरुवार पासून रंगणार १७ वर्षाखालील मुलींच्या संघाचे सामने

मुलींच्या ६ संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. हे सामने लीग पध्दतीने खेळविण्यात येणार आहे. १५ सामने रंगणार असून, मुलींच्या संघात आर्मी स्कूल, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, आठरे पाटील, कर्नल परब, श्री साई व ओएॅसीस स्कूलच्या संघाचा समावेश आहे.



जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व अ.नगर महापालिका आयोजित आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या संघासमवेत संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, गोपाल भागवानी, रूपचंद मोटवाणी, दामोधर माखिजा, महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, हरेष मध्यान, राजू गुरनानी, गीता तांबे, कांचन पापडेजा, गोदावरी किर्तानी, अमोल धोपावकर, प्रियंका मंगलारप आदी.

## आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत सेंट विवेकानंद स्कूलचा संघ विजेता

नगर – जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या १७ वर्षे वयोगटातील संघाने विजेतेपद मिळविले. अंतिम सामन्यात कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलला ४६-५ ने पराभूत करून त्यांनी हे विजेतेपद मिळविले, तसेच १४ वर्षे वयोगटात उपविजेतेपद मिळविले.

संघातील श्रीनाथ म्हस्के, अवनिश काळे, अथर्व काकडे, पार्थ पुप्पाल, साईराज कुळस्कर, हितेन पटेल, अथर्व म्हस्के, आर्यन चिंचणे, अदांत रच्चा, सोहम शेळके, आयुष गवळी यांनी उत्कृष्ट खेळ केला, तसेच १४ वर्षे वयोगटातील आर्चिज दसरे, कार्तिक बनकर, अपूर्व गुंजाळ, अलोक लोंढे, मयंक गायकवाड आदींनी उत्कृष्ट खेळ केला. खेळाडूंना क्रीडा शिक्षक अमोल धोपावकर व प्रियंका मंगलारप यांचे मार्गदर्शन लाभले.

संघातील यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी व सचिव गोपाल भागवानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष रूपचंद मोटवाणी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, हरेष मध्यान, राजू गुरनानी, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्या कांचन पापडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी आदी उपस्थित होते. विजयी संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



## कृषी विभागामार्फत निंबळक येथे ज्वारी बियाणे वाटप

मौजे निंबळक येथे २३ सप्टेंबर रोजी तालुका कृषी अधिकारी सिद्धार्थ क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी निंबळकच्या सरपंच प्रियंकाताई लामखडे, उपसरपंच बाळासाहेब कोतकर, शंकर कोतकर, बाळासाहेब मिंड, गोरख कोतकर, बबन कोतकर, कुलट, खपके आदि ग्रामस्थ.

## अहमदनगर जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये २४ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेचे उद्घाटन

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमासाठी उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ, माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी विलास साठे, महापालिका शिक्षणाधिकारी अरुण पालवे, निबंध स्पर्धा अशासकीय जिल्हा समिती सदस्य यश शहा, योगेश मुथा, विनोद संकलेचा, सुदर्शन डुंगरवाल व सहभागी असलेले विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे विद्यमान प्राचार्य उल्हास दुगड यांनी केले.



महावीर स्वामी कल्याणक महोत्सवानिमित्त आयोजित राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ. समवेत इतर अधिकारी वर्ग.

उद्घाटन प्रसंगी हिरामण झिरवळ यांनी आपल्या मनोगतातून सुविचारांचा अर्थ समजून घेऊन ते आचरणात आणले पाहिजेत, वाचनाने चांगला माणूस घडतो असे सांगितले. आकाश दरेकर यांनी विद्यार्थ्यांनी सर्व शालेय उपक्रमात सहभागी का व्हावे याचे महत्त्व पटवून दिले.

विलास साठे यांनी आजच्या काळात विचारांची लढाई जिंकणाऱ्या भगवान महावीर स्वामींचे तत्त्वज्ञान आचरणात आणणे आवश्यक आहे तसेच चांगले विचार पेरावे लागतात असे मत व्यक्त केले. अरुण पालवे यांनी विविध स्पर्धांमधील सहभाग भविष्याची दिशा ठरविण्यासाठी उपयुक्त ठरतो असे सांगितले.

इंजी.यश शहा यांनी स्पर्धेचे स्वरूप समजावून सांगून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व या प्रशालेचा माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान व्यक्त केला. कार्यक्रम आयोजनासाठी शहा यांनी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासन शालेय शिक्षण विभाग महापालिका प्रशासन यांच्याशी समन्वय साधला. संपूर्ण महाराष्ट्रात मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली व ललित गांधी संदीप भंडारी व इतर यांच्या समन्वयातून ३० सप्टेंबर पर्यंत स्पर्धा राबविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी, महापालिका प्रशासन यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती अशा सातपुते, पर्यवेक्षक विष्णू गिरी व रवींद्र भांड यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यापिका सौ. प्रगती बेगडे व अमेय कानडे यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. ज्येष्ठ अध्यापिका श्रीमती शोभा पालवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक सतीश गुगळे यांनी केले.

# बडीसाजन ओसवाल श्रीसंघाचे समाजोपयोगी उपक्रम माध्यमातून समाज उन्नतीसाठी कार्य

### पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन


श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या नवीन मंगल कार्यालयाच्या इमारतीत झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना अध्यक्ष पेमराज बोथरा. समवेत उपाध्यक्ष अजित कर्णावट, सचिव विशाल शेटिया, खजिनदार मिलिंद जांगडा, सहसचिव अनिल लुंकड आदींसह सर्व संचालक उपस्थित होते.

## बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

नगर – बडीसाजन ओसवाल श्रीसंघाचे सर्व संचालक व पदाधिकारी समाजाच्या हितासाठी निस्वार्थीपणे काम करत आहे. समाजासाठी योगदान देण्या सारखे दुसरे भाग्य नाही. या भावनेने समाजातील प्रत्येक घटक तनमनधनाने मोठ्याप्रमाणात सहकार्य करत आहेत. तसेच ज्येष्ठांचे आशीर्वाद व मार्गदर्शन वेळोवेळी मिळत असल्याने समाजोपयोगी उपक्रमांनी समाज उन्नतीसाठी बडीसाजन ओसवाल श्रीसंघ कार्य करत आहे. आपल्या मागच्या पिढीने आपल्याला दिलेला रूढी परंपरेचा वारसा आपल्याला जपण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. संस्थेचे सर्व अद्यावत सोईसुविधांनी सुसज्ज भव्य नवीन सांस्कृतिक भवनाचे काम सर्वांच्या सहकार्याने वेगाने पूर्णत्वास येत आहे. नगरचे वैभव वाढवणारी ही वास्तू ठरेल, असे प्रतिपादन बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांनी केले.

श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात व सभासदांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने झाली. दौंड रोडवरील नव्या मंगल कार्यालयाच्या इमारतीत सभासदांच्या उदंड प्रतिसादाने ही सभा उत्साहात झाली. यावेळी विषय पत्रीकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर झाले.

सभेस संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, सहसचिव अनिल लुंकड, खजिनदार मिलिंद जांगडा, सहखजिनदार दीपक बोथरा आदींसह सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या मंगल कार्यालयाच्या इमारतीच्या कामाचे यावेळी सर्व नागरिकांनी कौतुक केले.

पेमराज बोथरा पुढे म्हणाले, समाजातील दुर्बल घटकांसाठी बोथरा परिवाराच्या वतीने केडगाव येथे उभारण्यात येत असलेल्या घरकुल इमारतीचे काम लवकरच पूर्णत्वास येणार असून याचा लाभ गरजूंना होणार आहे. तसेच संस्थेच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांच्या मदतीसाठी सुवर्ण कमळ योजनेत वाढ केल्याने चांगला प्रतिसाद मिळत आहे. बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या युवक संघाचेही काम कौतुकास्पद असून समजाच्या कोणत्याही कामासाठी ते तत्पर असतात. याच युवकांना भविष्यात संस्थेची धुरा सांभाळायची आहे.

प्रास्ताविकात संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट यांनी सर्वांचे स्वागत केले. सचीव विशाल शेटिया यांनी संस्थेचे चालू असलेल्या कार्याचा आढावा घेत सूत्रसंचालन केले. खजिनदार मिलिंद जांगडा यांनी इतिवृत्त व ताळेबंद मांडला. दीपक बोथरा यांनी आभार मानले.

या सभेस बडीसाजन संघाचे संचालक धरमचंद कोठारी, पोपटलाल कटारिया, नरेंद्र चोरडिया, राजेंद्र ताथेड, नरेंद्र बाफना, राजेंद्र बोथरा, पोपट लोढा, मनोज शेटिया, किरण भंडारी, युवक संघाचे रुपेश पारख आदींसह सभासद उपस्थित होते.


ज्ञानसाधना गुरुकुल संगीत विद्यालयाचे उद्घाटन करताना मनोज कोतकर. समवेत संस्थेचे पदाधिकारी.

# शिक्षणाबरोबर विविध कलांचा विकास होणे काळाची गरज : नगरसेवक मनोज कोतकर

### केडगावला ज्ञानसाधना गुरुकुल संगीत विद्यालयाचे उद्घाटन

नगर – शिक्षणाबरोबर विविध कलांचा विकास होणे काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांना आवड असलेल्या क्षेत्रामध्ये पालकांनी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. केडगाव सारख्या ठिकाणी संगीत शिक्षण मिळत नसल्याने अनेक विद्यार्थांना व पालकांना या कलेपासून वंचित रहावे लागत होते. पण ज्ञानसाधना गुरुकुल संगीत विद्यालय मार्फत सर्व विद्यार्थांना संगीताचे धडे मिळणार असल्याचे मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी सांगितले.

केडगाव येथे ज्ञानसाधना गुरुकुल व संपूर्ण स्वरानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानसाधना गुरुकुल संगीत विद्यालयाचे उद्घाटन मनोज कोतकर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात गौरी शेळके, अदिती फलके, अखिलेश फलके, श्रुती चव्हाण, समृद्धी चव्हाण, भक्ती गुंड, वेदांत दैठणकर, कैवल्य कुलकर्णी, वरद कुलकर्णी, संदेश बेलदार या विद्यार्थांनी संगीताचे बहारदार सादरीकरण केले. प्रस्ताविकात प्रा. प्रसाद जमदाडे यांनी संगीत विद्यालयाचे उद्देश स्पष्ट केले.

पंडित महेश खोपटीकर म्हणाले की, अभ्यासा सोबत विद्यार्थांना कलेची आवड निर्माण व्हावी व त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वासह सर्वांगीन विकास होण्यासाठी ज्ञानसाधना गुरुकुलचे संगीत विद्यालय महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. तर गोरगरीब व जिज्ञासू विद्यार्थांना अल्प दरात ही शिक्षण सेवा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्याचबरोबर परिसरातील भजनी मंडळ व जेष्ठ नागरिकांसाठी ही लवकर संगीताशी संबंधीत वर्गाचे नियोजन केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उद्योजक संभाजी पवार, मुख्याध्यापक संदीप भोर, गोरख कोतकर, दिपक तागडे, प्राचार्या रुचिता जमदाडे, शबाना शेख, प्रा. शाहरुख शेख, ज्ञानसाधना गुरुकुलचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



## स्वामी गोविंदगिरीजी महाराज यांना लक्ष्मी नारायणाची प्रतिमा देण्यात आली भेट

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक १८३ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके, बीड सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी प्रज्ञा दीदी व सोलापूर येथील शेळगी नाका सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी अंजली दीदी यांनी अयोध्येतील श्री रामजन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद गिरीजी महाराज यांची सोलापूर येथे भेट घेऊन त्यांना जगभरात १४३ देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके व लक्ष्मी नारायणाची प्रतिमा भेट दिली व संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

# मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्षपदी खानसाहेब उस्मानमिया शेख, उपाध्यक्षपदी मेजर रउफ शेख व कार्याध्यक्षपदी हाजी आलम शफी खान

### नूतन कार्यकारिणीची निवड

नगर – मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा उत्साहात पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी खानसाहेब उस्मानमिया शेख, उपाध्यक्षपदी मेजर रउफ शेख व कार्याध्यक्षपदी हाजी आलम शफी खान यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

मुकुंदनगर येथे संघटनेचे ज्येष्ठ सदस्य ॲड. अन्वर शेख यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची सभा पार पडली. यावेळी संघटनेचे सचिव बशीर पठाण, सहसचिव रफिक मोहम्मद शेख, खजिनदार इस्माईल पठाण, हाजी बिलाल अहमद, मिर्झा नवेद, गोटू जहागीरदार, अब्दुल कादिर शेख, जी.एम. शेख, अब्दुल अजीज हैदर, ॲड. अनवर सय्यद, इकबाल सय्यद, हबीब शेख, आरिफ पटेल, नूर सय्यद आदींसह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.


मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्षपदी खानसाहेब शेख, उपाध्यक्षपदी मेजर रऊफ शेख तर कार्याध्यक्षपदी हाजी आलम शेख यांची सर्वानुमते निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सवमेत नूतन कार्यकारिणीचे इतर पदाधिकारी आदी.

मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यकारिणीच्या सल्लागारपदी नूर सय्यद व हबीब पठाण, कार्यकारणी सदस्यपदी ईस्माइल शेख, इब्राहिम पठाण, सईद हाफिज व आरिफ पटेल यांची निवड करण्यात आली आहे.

खानसाहेब शेख म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक संघ मुकुंदनगर हरित करण्यासाठी व्यापक प्रमाणात वृक्षरोपण संवर्धनाची मोहिम राबवणार आहे. तर नागरिकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतेसाठी जागृती करणार आहे. मुकुंदनगर येथील ओपन स्पेस व मैदानाभोवती वृक्षरोपण मोहिम हाती घेतली आहे. तर कोरोना काळात ज्या महिला विधवा झाल्या त्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पाठबळ दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मेजर रऊफ शेख म्हणाले की, मुकुंदनगर भागामध्ये ड्रेनेज, खड्डे व पाण्याची समस्या आहे. या समस्या सोडविण्यासाठी देखील ज्येष्ठ नागरिक संघाचा पाठपुरावा राहणार आहे. युवकांमध्ये व्यसनाचे वाढते प्रमाण चिंताजनक असून, या भागात गुटखाबंदी मोहिम राबविण्यासाठी देखील पुढाकार घेतला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. हाजी आलम शफी खान यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# उत्तरेतील विधानसभा मतदारसंघ आढाव्यासाठी काँग्रेसच्या निरीक्षक आ. रिता चौधरी नगरमध्ये


उत्तरेतील विधानसभा मतदारसंघ आढाव्यासाठी काँग्रेसच्या निरीक्षक आ. रिता चौधरी नगरमध्ये आल्यानंतर त्यांचे स्वागत करताना पक्षाचे पदाधिकारी.

नगर – ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या प्रतिनिधी शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या निरीक्षक आ. रिता चौधरी राजस्थानहून नगरमध्ये दाखल झाल्या आहेत. नगर उत्तरेच्या आढावा दौऱ्यावर त्या आल्या आहेत. राजस्थान विधानसभेतील तीन टर्म आमदार चौधरी यांच्यावर उत्तरेतील शिर्डी लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघांच्या निरीक्षक पदाची जबाबदारी आहे.

२४ सप्टेंबर रोजी त्यांच्या उपस्थितीत लालटाकी अहमदनगर येथील कालिका प्राईड मधील काँग्रेस कमिटी कार्यालयात बैठक पार पडली. जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी श्रीरामपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार लहू कानडे, घनश्याम शेलार, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष लताताई डांगे, प्रशांत दरेकर, दीप चव्हाण, संगमनेर सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन आणि उत्तर लोकसभा मतदारसंघाचे समन्वयक संतोष हासे आदी उपस्थित होते.

यावेळी त्या म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत आपण चांगली कामगिरी केली. विधानसभेतही आपण चांगला परफॉर्मन्स द्याल यात शंका नाही. संगमनेर आणि श्रीरामपूरच्या रूपाने काँग्रेस पक्षाकडे दोन लढवय्ये आमदार आहेत. आणखी दोन जागा पक्ष मागून घेणार आहे.

महाविकास आघाडीमधील तीनही घटक पक्ष खांद्याला खांदा लावून काम करतील. आणि काँग्रेस राष्ट्रवादी शिवसेनेचा प्रत्येक उमेदवार निवडून आणतील यात शंका नाही. लवकरच त्या दृष्टीने आखणी करून तिन्ही पक्षांची एकत्रित बैठक घेऊन जागा निश्चित कराव्यात. तळागाळापर्यंत कार्यकर्त्यांची फळी उभी करण्यासाठी यंत्रणा कामाला लावावी. बूथ लेवलच्या रचना करून घ्याव्यात. मित्र पक्षांनाही मदत व्हावी या दृष्टीने रचना असावी. विधानसभा निवडणुकीत लोकसभेप्रमाणे आपल्याला सहज विजय मिळवता येईल अशी परिस्थिती आहे.

सध्याच्या परिस्थितीत सत्ताधारी मारत असलेल्या भूलथापा, आणि फसव्या योजनांचा बोजवारा जनतेसमोर आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक मोहल्ला आणि चौका चौकात चर्चा घडवून आणाव्यात. सरकार विरोधी वातावरण अधिक तयार करावे. ज्याचा आपल्याला निवडणुकीत फायदा होईल असे त्यांनी म्हटले.

जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी नगर जिल्ह्यात माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली चांगली कामगिरी करत असून जिल्ह्यात नो व्हेअर झालेला पक्ष आता एव्हरी व्हेअर करण्यात आपण यशस्वी झालो. अशाच प्रकारे आगामी काळात आपल्याला कामगिरी करायची आहे. त्यात सातत्य ठेवायचे आहे. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जे वातावरण तयार झालेले आहे त्याचा फायदा करून घ्यायचा आहे. आपल्या सूचने प्रमाणे आपण निश्चितपणे कामाला लागू आणि श्रीरामपूर संगमनेर बरोबरच इतर चार जागांवरही आपण चांगली लढत देण्याची तयारी ठेवून आहोत असे विश्लेषण केले.

यावेळी आमदार लहू कानडे यांनी उत्तरेतील पक्ष अंतर्गत व्यूहरचनेचा लेखाजोखा मांडला. आपल्या निवेदनात त्यांनी सांगितले की, संगमनेर आणि श्रीरामपूर मध्ये पक्षाची बुथ लेवल यंत्रणा व्यवस्थित लागलेली आहे.

### बुथवरील कार्यकर्त्यांचा मतदारांशी दैनंदिन संपर्क आहे

त्यांना दररोज २५ मतदारांना भेटीचे टारगेट दिलेले आहे. ते पूर्ण झाले आहे की नाही हे पाहण्यासाठी त्यावर मतदार यादी प्रमुख नेमण्यात आलेले आहेत. नगर उत्तरेत या पद्धतीने रचना करण्यात येत असून सहाच्या सहा जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून येतील अशा दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



### केडगाव येथील भैरवनाथ मंदिरात मोफत नेत्र तपासणी शिबिर

शिवसेना नगर शहर आणि योगिराज गाडे मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने केडगाव येथील भैरवनाथ मंदिरात अकरावे मोफत नेत्र तपासणी शिबिराप्रसंगी शिवसेनाप्रमुख (ठाकरे गट) प्रा. शशिकांत गाडे, माजी नगरसेवक योगिराज गाडे, माजी शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते, महाराष्ट्र राज्य युवासेना उपसचिव विक्रम राठोड, माजी नगरसेवक अमोल येवले, माजी नगरसेवक संग्राम कोतकर, डॉ. श्रीकांत चेमटे, रावसाहेब भाकरे महाराज, संजय गारुडकर, महादेव कोतकर, ओंकार सातपुते, पप्पू दुबे, रावसाहेब नांगरे. दुसऱ्या छायाचित्रात मोफत चष्मे वाटप करताना प्रा. शशिकांत गाडे (छाया – उदय जोशी)

# कौशल्य विकास व रोजगार समितीच्या निमंत्रित सदस्यपदी विनायक देशमुख



नगर – महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी विनायक देशमुख यांची जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता समितीच्या निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत रोजगार व स्वयंरोजगार सहाय्यक संचालक, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, MIDC चे विभागीय अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, लिड बँकेचे जिल्हा प्रमुख, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, आदिवासी विकास, जिल्हा अल्पसंख्याक विकास अधिकारी यांचा समावेश आहे.

विनायक देशमुख हे मेकॅनिकल इंजिनिअर असुन १९८२ ते १९९४ या काळात त्यांनी क्रॉम्प्टन ग्रीवज लि. या कंपनीत त्यांनी अभियंता म्हणून काम केले आहे. कौशल्य विकास व प्रशिक्षण श्रेत्रात त्यांचा २० वर्षांपेक्षा जास्त काळ अनुभव आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर कौशल्य विकास योजना हाती घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून जास्तीत जास्त युवकांना कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले.

कौशल्य विकास या महत्वपूर्ण विषयांत काम करण्याची संधी दिल्याबद्दल श्री. देशमुख यांनी मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा यांचे आभार मानले आहेत.

# बाबुर्डी घुमटच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचा गणवेश वाटप

### प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपचा सामाजिक उपक्रम


बाबुर्डी घुमट येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये गरजू विद्यार्थ्यांना खेळाचा गणवेश वाटप करताना प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या जयाताई गायकवाड, अलकाताई मुंदडा. समवेत पदाधिकारी महिला.

नगर – महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी कार्यरत व गरजू विद्यार्थ्यांना पाठबळ देणाऱ्या प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने बाबुर्डी घुमट (ता. नगर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ५० गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना खेळाचे गणवेश वाटप करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरु असलेल्या उपक्रमातंर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, उपाध्यक्ष उषा सोनी, मीरा पोपलीया, सचिव हिरा शहापुरे, लीला अग्रवाल, प्रयास ग्रुपच्या संस्थापिका अलकाताई मुंदडा, रजनी भंडारी, नीलिमा पवार, लता डेंगळे, विद्या बडवे, आशा गायकवाड, मुख्याध्यापक नंदू धामणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदिप परभाणे, उपाध्यक्ष सचिन भगत, सरपंच नमिता पंचमुख, उपसरपंच ज्योती परभाणे, जीवनलता पोखरणा, अनुराधा फलटणे, आशा कटारे, भगवती चंदे, आरती थोरात, बेबीसोनी मंडलेचा, सोहनी पुरनाळे, मीरा पोफलिया, पवन लांडगे, भाऊसाहेब चव्हाण, शिक्षिका सोहनी पुरनाळे, प्रीती वाडेकर, आबा लोंढे, संजय दळवी, हेमाली नागापुरे, अपर्णा अव्हाड, वर्षा कासार, राजेंद्र काळे आदींसह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

जयाताई गायकवाड म्हणाल्या की, सर्वसामान्य घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व भौतिक सुविधा पुरेशा प्रमाणात मिळव्यात या उद्देशाने ग्रुपच्या महिला प्रोत्साहन देण्याचे काम करत आहे. विविध जिल्हा परिषद व खासगी संस्थेच्या शाळेत गरजू विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

अलकाताई मुंदडा म्हणाल्या की, शहरातील महिलांनी एकत्र येत, भावी पिढीला शैक्षणिक सुविधा मिळण्यासाठी ग्रुपच्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे. आजची मुले सक्षम झाल्यास उद्याचा सक्षम समाज घडणार आहे. परिस्थिती अभावी शिक्षण घेता आले नाही, ही खंत कोणत्याही विद्यार्थ्याच्या मनात राहून नये यासाठी त्यांच्या पाठिशी महिला उभ्या राहिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जीवनलता पोखरणा यांनी विद्यार्थी सुरक्षितेविषयी उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा विद्याताई बिडवे यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे व परिसरातील स्वच्छतेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी धावून आलेल्या ग्रुपच्या सर्व महिलांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. खेळासाठी नवीन गणवेश मिळाल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. इस्त्रो सहलीसाठी निवड झालेल्या दोन विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार ग्रुपच्या वतीने करण्यात आला.

# मेहेर बॉक्स क्रिकेट लीगचे २७ सप्टेंबरपासून आयोजन

नगर – भारतातील अवतार मेहेर बाबांच्या विविध केंद्रातील स्वयंसेवकांतर्फे २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान सावेडी येथील राजस्व स्पोर्ट्स ॲकॅडमी मैदानावर मेहेर बॉक्स क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय मैत्रीपूर्ण स्पर्धेत अमरावती, दर्यापूर, नागपूर, पुणे, परतवाडा, आर्वी, रोहणा, हैदराबाद, विजयवाडा, आंध्र, गोकुळ गुंडेगाव, यवतमाळ, अहमदनगर, अरणगाव आणि मेहेराबाद येथील संघांचा सहभाग राहणार आहे.

उद्घाटन समारंभ २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९:३० वाजता उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे आणि अवतार मेहेर बाबा ट्रस्टचे चेअरमन व विश्वस्त यांच्या उपस्थितीत होणार आहे.

अवतार मेहेरबाबा अहमदनगर केंद्राचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी आणि आयोजकांतर्फे प्रशांत दादर यांनी नगरकरांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले आहे. क्रिकेट हा मेहेरबाबांचा आवडता खेळ होता. या स्पर्धेचे उद्दिष्ट मेहेर बाबांच्या शिकवणींनुसार, सेवेतील प्रभुत्व या संदेशाची वास्तविक जीवनात अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणे असे आहे.

# कॅलिडोस्कोप



## कासवांची त्सुनामी

**निसर्गाची किमया न्यारी, पुरूस नदीच्या किनारी अवतरली कासवांची स्वारी...**

शेजारील छायाचित्रातलं दृश्य ब्राझीलमधल्या पुरूस नदीच्या किनाऱ्यावरचं. इथे चिमुकली कासवं अवतरली आणि निसर्गप्रेमींच्या आनंदाला उधाण आलं. पुरूस नदीकाठी ९२ हजारांपेक्षाही अधिक कासवांचा जन्म झाला. म्हणूनच याला कासवांची 'त्सुनामी' म्हटलं गेलं. ही कासवं साधीसुधी नव्हती. ती होती 'साउथ अमेरिकन रिव्हर टर्टल' या दुर्मीळ प्रजातीच्या कासवांची पिल्लं. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या तस्करीमुळे ही प्रजाती लुप्त होत चालली आहे. म्हणूनच या कासवांच्या संवर्धनाचे प्रयत्न होत आहेत. अंड्यांमधून बाहेर पडलेली ही कासवं नदीच्या दिशेने धाव घेतात. निसर्गाचा हा चमत्कार डोळ्यांत साठवण्यासारखाच असतो. पुरूस नदीकिनारी कासवांचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर जन्म होणं ही सध्याच्या नकारात्मक वातावरणातली सकारात्मक बाब म्हटली पाहिजे.

## पोलिसांची फिल्मी शैली

जयपूर पोलिसांनी हिमाचल प्रदेशमधील हॉटेलमध्ये ओलीस ठेवलेल्या मुलाला अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सोडवले. काही पोलिस कर्मचारी हॉटेलच्या खोलीत घुसले. तिथे अनुज नावाच्या मुलाला त्यांनी हाक मारली, तेव्हा तो मुलगा झोपेतून जागा झाला आणि त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही.

पोलिस आयुक्त बिजू जॉर्ज जोसेफ यांनी सांगितले, की अनुज १८ ऑगस्ट रोजी जयपूरमधील नाहरगढ हिलवर मित्रासोबत गेला होता. तेथे असताना अपहरणकर्त्यांनी अनुजला पाहिले. त्याचे छान कपडे पाहून तो श्रीमंत घराण्यातला आहे असे वाटले. त्यांनी त्याचे हात-पाय बांधून जबरदस्तीने गाडीत बसवले. ब्रह्मपुरी पोलिसांनी जयपूरमध्ये घटनास्थळ गाठून ड्रोनच्या सहाय्याने शोध घेतला; मात्र अनुज सापडला नाही. पोलिसांनी अनेक पथके तयार करून तपास सुरू केला. अपहरणकर्त्यांनी अनुजच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून २० लाख रुपयांची



खंडणी मागितली. एवढ्या मोठ्या रकमेची व्यवस्था करता न आल्याने कुटुंबीयांनी थोडा वेळ मागितला.

दरम्यान, पकडले जाऊ नये म्हणून वारंवार ठिकाणे बदलणाऱ्यांचा फोन नंबर ट्रेस करून पोलिस अपहरणकर्त्यांचा शोध घेत होते. शेवटी त्याने कुटुंबाला कालका-शिमला एक्स्प्रेस ट्रेनच्या शेवटच्या डब्यात पैसे पाठवायला सांगितले. वीरेंद्र सिंग, विनोद, अमित कुमार, जितेंद्र भंडारी आणि जमुना सरकार अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपहरणाचा मुख्य सूत्रधार वीरेंद्र सिंग असून तो सॉफ्टवेअर इंजिनीअर आहे. त्याच्या व्यवसायातील आर्थिक नुकसानीमुळे त्याने हे पाऊल उचलले. त्याने आपल्या तांत्रिक ज्ञानाचा वापर करून आपल्या जुन्या ओळखीच्या अमित कुमार आणि विनोद सिंग यांच्यासमवेत आपली लिव्ह-इन पार्टनर जमुना सरकारला खंडणीसाठी अपहरणाच्या योजनेत सहभागी करून घेतले.

## वेटर बनले देवदूत

पौडजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याच्या दुर्घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेण्यापूर्वी तेथील एका हॉटेलमधील वेटर देवदूत बनून घटनास्थळी पोहचले. घटनास्थळावरील हेलिकॉप्टरमधून जखमींना बाहेर काढून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले.

मुळशी तालुक्यातील कोंढावळे गावात हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेनंतर गावालगत असलेल्या गारवा वाटाणे मळा या हॉटेलमधील सगळे वेटर्स हातातील काम टाकून पळत सुटले. त्यांनी कुठलाही मागचा पुढचा विचार न करता घटनास्थळ गाठून दुर्घटनेतील चार



जणांना वाचविण्यासाठी, त्यांच्या बचावासाठी शर्थीचे प्रयत्न केले. आयुष्याच्या संघर्षमय प्रवासात दररोज वेटर्सचे काम करणारे ही सगळी मंडळी दुर्घटनेतील चार जणांसाठी देवदूत ठरली. अशा अपघातस्थळी किंवा दुर्घटनाग्रस्त ठिकाणावर प्रशासकीय यंत्रणा, पोलिस यंत्रणा व ट्रेनिंग असलेली रेस्क्यू टीम तत्परतेने काम करते; मात्र रेस्क्यू टीम पोहोचवण्यापूर्वीच या वेटर्सनी घटनास्थळी जाऊन दुर्घटनेतील चारही जणांना बाहेर काढून प्रथमोपचार केले. अपघातग्रस्तांना धीर देण्याचे काम केले. त्यामुळे कुणीतरी आपली काळजी घेत असल्याचा विश्वास त्यांना मिळाला.

## पाच वर्षांत 'आयपीएस' पदाचा राजीनामा

पूजा खेडकरचे आयएएस पद घोटाळ्यामुळे रद्द करण्यात आले. 'युपीएससी' देशातील सर्वात कठीण आणि वरिष्ठ पद मिळवून देणारी परीक्षा आहे. त्यामुळे 'युपीएससी' उत्तीर्ण होऊन करिअर करण्यासाठी लाखो, करोडो तरुणाई रात्रीचा दिवस करून काम करत; मात्र 'युपीएससी' परीक्षेतून 'आयपीएस' पदाला गवसणी घालणाऱ्या काम्या मिश्रा यांनी अवघ्या पाच वर्षातच आपल्या पदाचा राजीनामा दिला.



बिहारच्या दरभंगा येथील ग्रामीण पोलिस अधीक्षक आयपीएस काम्या मिश्रा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. स्वत: काम्या मिश्रा यांनीच याबाबत माहिती दिली असून व्यक्तिगत आणि घरगुती कारणास्तव राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले. मी आई-वडिलांची एकुलती एक लेक आहे, आमचा मोठा उद्योग-व्यापार आहे, सध्या तोच सांभाळायचा आहे. त्यामुळेच, मी नोकरी सोडते, नाहीतर एवढी चांगली नोकरी कोण सोडेल, असे काव्या मिश्रा यांनी सांगितले.

काव्या मिश्रा यांनी वयाच्या २२ व्या वर्षीच 'युपीएस'सी परीक्षा उत्तीर्ण केली होती. या परीक्षेच्या रँकींगमधून त्यांना आयपीएसपदी संधी मिळली. २०१९ साली त्यांनी पहिल्याच प्रयत्नात 'युपीएससी' क्रॅक केली होती. त्यानंतर, त्यांना सर्वप्रथम हिमाचल कॅडरमध्ये नेमणूक देण्यात आली. २०२१ मध्ये त्यांची बदली बिहार कॅडरमध्ये करण्यात आली होती. काव्या यांचे पती अवधेश दीक्षित हेही २०२१ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. सध्या ते मुजफ्फरनगर शहर पोलिस अधीक्षकपदी कार्यरत आहेत.

दरम्यान, काव्या मिश्रा यांनी चार वर्षांच्या कार्यकाळात पोलिस खात्यात स्वत:ची चांगली प्रतिमा निर्माण केली आहे. लेडी सिंघम म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. विशेष म्हणजे दरभंगा जिल्ह्यातील पहिल्या महिला ग्रामीण एसपी म्हणून त्यांना संधी मिळाली. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून बीएची पदवी प्राप्त केल्यानंतर 'युपीएससी' स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. नोकरीत मन लागत नाही, असे म्हणत त्यांच्याकडून सातत्याने राजीनामा देण्याचे संकेत येत होते. अखेर, त्यांनी आपला राजीनामा दिला.

## बुटात चक्क अजगर!

आपला प्रवास अविस्मरणीय व्हावा असं प्रत्येकालाच वाटत असतं. या प्रवासासोबत बऱ्याच आठवणीही जोडलेल्या असतात. कुठे तरी फिरून आल्यानंतर बॅगेतून सामान बाहेर काढत असताना आपल्यासमोर एखादा भीतीदायक प्राणी आला तर? आपल्याला धक्काच बसेल! स्कॉटलंडच्या मोएरा नावाच्या महिलेच्या बाबतीत असंच काहीसं घडलं. ऑस्ट्रेलियाचा हा दौरा तिच्या कायम लक्षात राहील. घरी आल्यानंतर मोएराने बॅगेतून सामान काढायला सुरुवात केली. त्यात बुटही होते. या बुटांमध्ये तिला काही तरी हालचाल जाणवली.



मोएराने निरखून पाहिलं तेव्हा त्यात तिला चक्क एक अजगर दिसला. हा अजगर ऑस्ट्रेलियाहून तिच्यासोबत आला होता. मॅकेपासून ग्लासगोपर्यंतच्या ९३०० मैलांच्या प्रवासात तो तिच्यासोबत होता. मोएराची नजर पडली तेव्हा हा अजगर कात टाकत होता. बुटात अजगर बघून मोएराची बोबडीच वळली. पण तो बिनविषारी असून अनेक लोक हा अजगर पाळत असल्याचं कळल्यानंतर तिचा जीव भांड्यात पडला. हा अजगर पाहिल्यानंतर माएराला पहिल्यांदा काही कळलंच नाही. गंमत करण्यासाठी कोणतीही बुटांमध्ये रबरी साप लपवला असावा असा तिचा समज झाला. पण हा खरा अजगर असल्याचं लक्षात आल्यावर तिने तातडीने प्राणीमित्र संस्थेला संपर्क केला. ऑस्ट्रेलियामध्ये मधल्या काळात उकाडा प्रचंड वाढला होता. साप उन्हाळ्यात थंड जागेच्या शोधात असतात. म्हणूनच ऑस्ट्रेलियन लोकांच्या घरांमध्ये साप आसरा घेत असल्याचं चित्र पहायला मिळत आहे. असंच काही माएराच्या बाबतीत असंच काही घडलं असावं, असा अंदाज बांधला जात

## शिक्षिका झोपल्या वर्गातच!

शाळेच्या वेळेत विद्यार्थ्यांना शिकवताना चक्क एक शिक्षिका वर्गात चटई अंथरून झोपली. इतकेच नाही, तर तिने विद्यार्थ्यांना पुठ्ठ्याने हवा घालायला लावली. उत्तर प्रदेशामधील प्राथमिक शाळांमधील सरकारी शिक्षक मुलांना कसे शिकवतात आणि त्यांचे भविष्य घडवत आहेत, हे या घटनेवरून स्पष्ट होते. अलीगडमधील एका प्राथमिक शाळेतील शिक्षिका शाळेच्या वेळेत वर्गात झोपून राहिली. इतकेच नव्हे तर, वीज नसल्यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांना पुठ्ठ्याने हवा घालायला लावली.

शिक्षक शाळेतील वर्गात चटईवर झोपली आहे आणि शाळेच्या गणवेशात असलेले चिमुकले विद्यार्थी तिला हातपंख्याने हवा घालत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला हा व्हिडीओ अलीगढ जिल्ह्यातील धानीपूर ब्लॉकमधील आहे.

तपास विभागाचे शिक्षणाधिकारी राम शंकर कुरील यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. याप्रकरणी प्राथमिक शिक्षणाधिकारी राकेशकुमार सिंह यांनी कारवाई केली आहे. शाळेच्या मुख्याध्यापक डिंपल बन्सल यांना शिक्षकांच्या नियमांचे उल्लंघन करणे, मुलांना मारहाण करणे आणि इतर बाबींसाठी तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले.




## हुंडा दिला परत !


राजस्थान मधील सेवानिवृत्त प्राचार्य बृजमोहन मीना यांनी टोक जिल्ह्यातील खेड्यात आपल्या मुलाचा विवाह जुळविला. परंपरेनुसार वधुपित्याने हुंड्यापोटी ११ लाख रुपये आणले. बृजमोहन यांनी हे पैसे आपल्याला नको. आम्हाला फक्त मुलगी हवी आहे. असे सांगून हुंडा म्हणून मिळत असलेले ११ लाख रुपये परत केले. केवळ शगुनाचे शंभर रुपये त्यांनी ठेवले.




बृजमोहन मीना खजुरी पंचायतीच्या पिपरवाला गावात राहतात. त्यांचा मुलगा रामधन याला विवाहात हुंड्यापोटी ११ लाख १०१ रुपये दिले. बृजमोहन यांनी या रकमेतून १०१ रुपयांची भेट घेतली आणि ११ लाख रुपये घेण्यास नकार दिला. कार्यक्रमास उपस्थित लोकांनी त्याचे कौतुक केले आणि सर्वांनी त्यापासून शिकण्याचे आवाहन केले. नववधू म्हणाली, की सासरच्यांनी मुलींचा सन्मान वाढवला. बृजमोहन मीना यांचा मुलगा रामधन यांच्याशी आरतीचा विवाह होणार आहे. वधू तिच्या भावी सासरच्या निर्णयामुळे खूप आनंदित आहे. हुंड्याची रक्कम परत करून त्यांनी समाजापुढे आदर्श घालून दिल्याचे आरतीने सांगितले. त्यामुळे मुलींचा सन्मान वाढेल. त्याचवेळी आरतीचे आजोबा प्रभूलाल मीना यांचे म्हणणे आहे, की बृजमोहन मीना यांचे हुंडा परत करणे ही आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. टोक, बुंदी, सवाई माधोपूर जिल्ह्यातील हे हे पहिलेच प्रकरण आहे. त्यांनी समाजाला नवी प्रेरणा दिली.




## लीक झाले तीनशे कोटी ई मेल आयडी



वाढत्या ऑनलाइन ट्रेंडमुळे सायबर क्राइमचा धोकाही वाढला आहे. ३०० दशलक्षाहून अधिक ई-मेल आयडी लीक झाले आहेत. यापूर्वी २०१७ मध्ये १०० कोटीहून अधिक लोकांचा डेटा लीक झाल्याची घटना घडली होती. नेटफ्लिक्स आणि लिंक्डइन प्रोफाइलदेखील समाविष्ट केले.

या अहवालानुसार जीमेल व्यतिरिक्त ११० कोटी लोकांच्या नेटफ्लिक्स आणि लिंकडिन प्रोफाइलचा समावेश आघाडीच्या डेटामध्ये करण्यात आला आहे. खास गोष्ट अशी आहे की प्रथमच डेटा लीकमध्ये नेटफ्लिक्स आणि लिंक्डइन प्रोफाइलदेखील आहेत. यामध्ये मिनेक्राफ्ट, बडू, बिटोकॉइन आणि पेस्टीबिनच्या वापरकर्त्यांनाही याचा फटका बसला आहे. या डेटा गळतीस अनुपालन अनेक ब्रीच (सीओएमबी) म्हणतात. हॅकिंगच्या माध्यमातून सुमारे १,५०० कोटी खात्यांचा ड़ेटा लीक झाला आहे, तर जवळपास ३२० कोटी लोकांचे ईमेल आयडी संकेतशब्द हॅक झाले आहेत. त्याचे बळी हे अधिक वापरकर्ते होते, जे नेटफ्लिक्स आणि गूगलसाठी समान संकेतशब्द वापरत होते. वापरकर्त्यांचा हा डेटा इंटरनेटवर अपलोड करण्यात आला आहे. चोरी केलेला डेटा इतर खाती हॅक करण्यासाठीदेखील वापरला जाऊ शकतो.

## स्नायू करतात काय?

आपल्या शरीराचं कार्य विविध संस्थांच्या माध्यमातून चालतं. या पचनसंस्था, मज्जासंस्था तसंच विविध अवयव एकमेकांशी जोडलेले असतात. स्नायू हा शुद्धा शरीरातला अत्यंत महत्त्वाचरा घटक. ही स्नायूसंस्था शरीरातल्या इतर प्रत्येक संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवते. शरीराची हालचाल स्नायूंमुळेच शक्य होते. चेहऱ्यावरचे भावही स्नायूंमुळेच बदलत असतात. स्नायूंमुळे शरीराला विशेष करून हाडांना आधार मिळतो. शरीराची रचना प्रमाणबद्ध ठेवण्यासाठी स्नायू हाडांच्या साथीने काम करतात. मानवी शरीरात



तीन प्रकारचे स्नायू असतात. शास्त्रीय भाषेत त्यांना स्केलेटल, कार्डिॲक आणि स्मूथ मसल्स असं म्हणतात. स्केलेटल मसल्स हाडांना जोडलेले असतात. या स्नायूंमुळेच शरीराची हालचाल होते. कार्डिॲक म्हणजे हृदयालगतचे स्नायू. या स्नायूंमुळेच हृदय आकुंचन आणि प्रसरण पावतं. स्मूथ मसल्स विविध अवयवांच्या आत असतात. आपण हसतो तेव्हा चेहऱ्याचे सतरा स्नायू कार्यान्वित होतात. रागाची भावना चेहऱ्याच्या माध्यमातून व्यक्त करायची असेल तर ४३ स्नायूंची गरज लागते. माणसाच्या शरीरात ६०० च्या आसपास स्नायू असतात. ग्लुटेअस मॅक्सिमस हा शरीरातला सर्वात मोठा स्नायू आहे. जिने चढताना होणाऱ्या शारीरिक हालचालीत या स्नायूचा मोठा सहभाग असतो. कानाच्या आतल्या भागात सर्वात लहान स्नायू वसलेला असतो. सर्वात बळकट स्नायू आपल्या जबड्यांमध्ये असतो. हृदयातले स्नायू सतत कार्यरत असतात तर डोळ्यांच्या स्नायूंवर सर्वात जास्त ताण येतो. तसंच सहा स्नायूंमुळे डोळ्यांची हालचाल शक्य होते.

## एका मुलासाठी बांधली शाळा

प्रत्येकाला शिक्षण घ्यायचा अधिकार आहे. म्हणूनच अमेरिकेतल्या सरकारने फक्त एका मुलासाठी शाळा सुरू केली. इथल्या व्योमिंगमधल्या लारामी शहरात हा उपक्रम राबवण्यात आला. व्योमिंगमधल्या नियमानुसार नागरी वस्तीपासून लांब राहणाऱ्या मुलांना लांबच्या शाळेत प्रवेश देता येत नाही. याच नियमामुळे अमेरिकन सरकारने एका मुलाला शिक्षण देण्यासाठी काही डॉलर म्हणजे जवळपास एक कोटी रुपये खर्च करून शाळा सुरू केली. अर्थात इथे असं पहिल्यांदा घडत नाहीए. याआधी २००४ मध्येही एकाच मुलाला शिकवण्यासाठी शाळा सुरू करण्यात आली होती. लारामीचा बराचसा भाग डोंगराळ असल्यामुळे बरीच मुलं नागरी वस्तीपासून लांब दुर्गम भागात राहतात. या मुलांना लांबच्या शाळेत पाठवता येत नाही. मग त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारला करावी लागते. म्हणजे एवढ्या मोठ्या शाळेत फक्त एकच मुलगा शिकणार आहे. शिक्षकांना आणि या विद्यार्थ्याला त्रास द्यायला कोणीही येणार नाही!



## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

देवाधिदेव तीर्थंकर प्रभूंच्या आध्यात्मिक स्थिरतेचे वर्णन करताना संयमनिष्ठ आचार्यश्रींनी संयमाचे सुंदर सुगंधी १५ वे भक्तिपुष्प परमेश्वराच्या चरणी अर्पण केले आहे.

हे परमेश्वरा! छद्मस्थ अवस्थेत, जेव्हा तुम्ही साधना काळात ध्यानस्थ राहता, तेव्हा तुम्ही धार्मिक ध्यान आणि कथनात पूर्ण एकाग्रतेने आणि स्थिरतेने उभे राहतात त्यावेळी तुमच्या सुवर्ण देहाच्या तेजाने आकर्षित होऊन इंद्रिय देवी (कामुक) तुमच्या शरीराच्या नाभीला वारंवार स्पर्श करतात. नृत्य, गायन, हावभाव, वाक्प्रचार इत्यादीद्वारे तुमचे मन आकर्षित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्रिदश म्हणजेच देवांच्या सुंदर देवी आणि बोगदे, या भवान पती आणि वनवंतरा जातीच्या देवता आहेत, आणि ते वैक्रिय देहस्वरूपाचे असल्याने त्यांचे विविध रूपात रुपांतर होते. ती कामुकतेमुळे शारीरिक शरर सुंदर बनते. ज्ञानसत्रात असा संदर्भ आहे की, देवी बली रावणावली, जी समुद्रात वास्तव्य करते, ती समुद्रातील प्रवाशांना आकर्षित करायची व वासनेचे दुःखद परिणाम त्यांना भोगावे लागले. चार प्रकारच्या मानसिक अवस्था (१) मानसिक अस्वस्थतेचे कारण सापडले आणि मन विकृत झाले, (२) विकाराचे कारण न सापडल्याने मन विचलित झाले नाही, (३) स्थावर आणि अचल निरर्थक कारण समोर आहे, तरीही मन विचलित होत नाही, (४) मनाची हालचाल सुरू असताना, या विकाराला कारणीभूत कोणी आढळले नाही. तरीही मन विचलित झाले. राग विजेता वितरागी प्रभू कोणत्याही परिस्थितीत ते डगमगत नाही, जेव्हा अवसर्पिणी काळातील पाचवा दुख्मा आरा निघून जातो, तेव्हा सात दिवस थंकार संवर्तक वारे वाहतात, त्या भयंकर वादळामुळे पहिल्या टप्प्यात सर्व धर्म (जैन), दुसऱ्या टप्प्यात (प्रहर) सर्व पंथ, धर्म आणि संप्रदाय, तिसऱ्या टप्प्यात रोष सर्व व्यवहार आणि राजनीति आणि चौथ्या टप्प्यात अग्नीतत्त्व नामशेष होते. त्यावेळीही सुमेरू अविचल राहतो. गीतेच्या भाषेत ज्या महापुरुषांना प्रज्ञा म्हणतात त्यांना जैन दृष्टिकोनातून वीतरागी म्हणतात किंवा जीना म्हणतात.

नीतीमध्ये असे म्हटले आहे की, विचार ''हेतो सति विक्रियन्ते, येषम न चेतंसि सः एव धीरा ।। म्हणजेच उत्कटतेचे कारण जरी वत्थ असले तरी ज्यांना विद्धाराचा त्रास होत नाही तेच रोगी आहेत, असे म्हटले आहे.

तुझ्या कृपेने मलाही ब्रह्मचर्य व्रत पाळण्याची अखंड दैवी शक्ती मिळो, स्वतःमध्ये विकार होतो. फळ क्षणिकत सुखदायक, विष आणि धूळ भयंकर आणि नित्य वेदनादायक असते. हे प्रभू आतापर्यंत मी व्यभिचारी झालो आहे आणि धार्मिक विधी चांगली संगत आणि आदर याकडे दुर्लक्ष केले आहे. तपश्चर्या आणि सेवेपासून दूर राहिले. आता माझ्या लक्षात आले आहे की, हा विषय विकार त्रिमूर्ती वाढणारी श्रवणशक्ती आहे. हे देवाधिदेव मी प्रार्थना करतो. संपुट बनवा आणि पुन्हा पाठ करा.

हे श्रणम, श्रमनियां! ये काम भोग, विष और शल्य के समान भयंकर दुःखदायी आहे. जे कामवासनामध्ये अटकतात. ते दुःखी होऊन दुर्गति पथावर जातो. म्हणून मनाचे संग तन नाही दे, तर तो पुन्हा सांभाळण्याची शक्यता आहे. म्हणतात ना :

**'मन गया तो जान दे वंश में रखो शरीर ।**
**खींचे बिना कमान के कैसे लागे तीर ।।'**

*** गाथा * (१५)**

**चित्रं किमत्र यदि ते त्रिदशांग नाभिर –**
**नीतं मनागपि मनो न विकार – मार्गम् ।**
**कल्पान्त – कालमरुता चलिता चलेन –**
**किं मन्दराद्रि शिखरं चलितं कदाचित् ।।१५।।**

**अर्थ–** देवदानवा गंधव्वा जख्खा स्क्खासा किन्नर, ते बांभायरीला प्रणाम करतात आणि जे अवघड करतात.

**– सौ. सविता चोरडिया**

# सुधारित पेन्शन योजना नको; आम्हाला हवी जुनी पेन्शनच!
## शिक्षक भारती संघटनेचा आग्रह : नव्या आदेशाबाबत संभ्रम

नगर – देशभरातील कर्मचारी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करत आहेत तथापि लक्ष विचलित करण्यासाठी शासनाने २० सप्टेंबर रोजी आदेश जारी केल्याचा आरोप शिक्षक भारती संघटना करत आहे. कुठलीही सुधारित पेन्शन नको, तर जुनी पेन्शनच हवी, असा आक्रमक पवित्रा शिक्षक भारती संघटनेने घेतला आहे, अशी माहिती शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली. राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, तसेच केंद्र शासनाचे एकीकृत निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासन आदेश २० सप्टेंबर रोजी काढण्यात आला आहे. अशी माहिती शिक्षक भारती संघटनेचे संस्थापक आमदार कपिल पाटील, राज्याध्यक्ष अशोक बेलसरे,सुनील गाडगे यांनी दिली.

या योजनेबाबत शिक्षक भारती संघटनेच्या शीलेदारांमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे. यासंदर्भात संघटनेकडून असे सांगण्यात आले की, हा शासन आदेश व कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शनची मागणी यामध्ये खूप मोठी तफावत आहे. नव्याने आलेली योजना पुन्हा शेअर मार्केटची भर करणारी आहे. या योजनेसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून होणारी वेतनाच्या १० टक्के कपात व शासनाकडून दर महिन्याला १८.५ टक्के रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवली जाणार आहे. कर्मचारी सेवेत आहे, तोवर दर महिन्याला २८.५ टक्के रक्कम कर्मचारी व सरकार यांच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवली जाणार आहे.



या आदेशानुसार सेवा कालावधी गणना प्रत्यक्ष भरलेल्या अंशदानाशी निगडित आहे. म्हणजे जितकी वर्षे कपात त्यानुसार निवृत्ती वेतन मिळेल. यापूर्वी वेतनातून अंशदान कपात नसेल, तर ती रक्कम व्याजासह भरावी लागणार आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत संचित रक्कम काढता येणार नाही. वीस वर्षे ते दहा वर्षांदरम्यान ज्यांची सेवा होईल, त्यांना सेवेच्या प्रमाणात निवृत्तीवेतन असेल. राज्य शासनाच्या योजनेत सेवेची अट वीस वर्षे तर योजनेत २५ वर्षे सेवेची अट आहे. दहा वर्षांपेक्षा कमी सेवा असल्यास निवृत्तीवेतन नाही. तसेच १० वर्षे सेवा झाले असल्यास साडेसात हजार रुपये तर यूपीएसमध्ये दहा हजार रुपये किमान निवृत्तीवेतन देण्यात आले आहे.

यापूर्वी सेवानिवृत्त अथवा नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याला त्याच्या संचित निधीतून प्राप्त ६० टक्के परतावा रक्कम शासनाकडे भरावी लागणार आहे. त्यामुळे आम्हाला दुसरी कुठलीही योजना मान्य नसून आम्ही जुनी पेन्शन योजनेच्या मागणीवर ठाम असल्याचे शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सुनिल गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर,जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्षरामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे. सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी स्पष्ट केले.

# दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सच्या नगर केंद्राचा जीवनगौरव पुरस्कार अरविंद पारगांवकर यांना प्रदान

नगर – भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६४ व्या जयंती निमित्त दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सच्या अहमदनगर केंद्रातर्फे अभियंता दिन विविध उपक्रम व स्पर्धा, परिसंवादाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मेडियम स्कूलच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी एक्साइड इंडस्ट्रीजचे चीफ ऑपरेशनल मॅनेजर संदीप मुनोत, पुण्याच्या जे.एस.पी.एम विद्यापीठचे डीन डॉ.राजकुमार देशपांडे व श्नायडर इलेक्ट्रिक इंडियाचे उपाध्यक्ष अरविंद पारगांवकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सचे नगरचे अध्यक्ष मनोहर अणेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास उपाध्यक्ष ॲड. अभय राजे यांच्यासह इंजिनीअर्स व इंजिनीयरिंग महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

### प्रवीण बजाज यांचेकडून 'कौशल्य विकास' केंद्रासाठी संस्थेला ५ लाख रुपयांची देणगी



दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सच्या नगर केंद्रातर्फे अभियंता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्नायडर इलेक्ट्रिक इंडियाचे उपाध्यक्ष अरविंद पारगांवकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना पुण्याच्या जे.एस. पी.एम विद्यापीठाचे डीन डॉ.राजकुमार देशपांडे, संस्थेचे नगर शाखेचे अध्यक्ष मनोहर अणेकर व उपाध्यक्ष ॲड. अभय राजे, एक्साइड इंडस्ट्रीजचे चीफ ऑपरेशनस मॅनेजर संदीप मुनोत आदी.

या कार्यक्रमात अभियांत्रिकी, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल अरविंद पारगांवकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.राजकुमार देशपांडे यांचे यांचे कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रमुख व्याख्यान झाले. यावेळी उद्योजक प्रवीण बजाज यांनी संस्थेच्या 'कौशल्य विकास' केंद्रासाठी पाच लाख रुपयांची देणगी दिली. यावेळी विविध अभियंता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

डॉ. राजकुमार देशपांडे यांनी व्याख्यानात कृत्रिम बुद्धिमत्तेचे औद्योगिक, औषध निर्माण, शस्त्रक्रिया, आरोग्य, वित्त, विपणन या क्षेत्रातील महत्त्व विशद करताना त्याचा मानवी जीवन सुखकर होण्यास कशी मदत होत आहे हे स्पष्ट केले. तसेच नुकत्याच पेजरद्वारे बॉम्ब स्फोट घडवून आणलेल्या घटनेचा उल्लेख करून विध्वंसक कारवायांसाठी आधुनिक सेन्सरचा वापर झाल्याचे त्यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून झालेला विकास शास्वत, प्रगतशील व सातत्यपूर्ण असावा असे त्यांनी नमूद केले.

अरविंद पारगांवकर यांनी औद्योगिक क्रांतीमुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून, पर्यावरणावरील ताण कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेने दिलेला जीवनगौरव पुरस्कार शक्ती व प्रेरणा वाढवणारा आहे. संस्थेच्या नव्या अभियंता भवनाची इमारत शहराच्या वैभवात भर घालणारी असून येथे नव्या इंजिनिअर्स साठी अभ्यास केंद्र सुरु करावे, यासाठी सहकार्य करू असे आश्वासन दिले.

प्रमुख अतिथी संदीप मुनोत यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा औद्योगीकरणाचा प्रत्यक्ष संबंध असल्याचे स्पष्ट केले. पाण्याचा पुनर्वापर, अक्षय ऊर्जा निर्मिती, इलेक्ट्रिक वाहने, या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विकसात्मक बदल होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष मनोहर अणेकर यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या कामाचा आढावा घेतला, तसेच नगर–कल्याण रोडवर नव्याने उभारण्यात आलेल्या अभियंता भवन या स्वतःच्या इमारतीत संस्थेचे कार्यालय स्थलांतरित झाले आहे. संस्थेला आचार्य चाणक्य कौशल्या विकास केंद्र म्हणून शासनाची मान्यता मिळाली आहे, संस्था लवकरच कौशल्य विकास केन्द्रित कोर्सेस येथे सुरू करत आहे. यासाठी संस्थेच्या सभासदांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे इलेक्ट्रॉनिक अँड टेलीकम्यूनिकेशन विभाग प्रमुख प्रा. डॉ.बाळासाहेब आगरकर, अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विष्णु आहेर यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार, पुण्याच्या स्ट्रक्टकॉन डिजाइनस कंपनीचे सरव्यस्थापक महेंद्र गोविंद, नगरच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब कर्डिले, संजीवनी केबीपी तंत्रनिकेतनचे संगणक विभाग प्रमुख डॉ. गणेश जोर्वेकर, राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. कृपाल पवार व प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी सहाय्यक प्राध्यापक डॉ. मिलिंद म्हसके यांना अभियांत्रिकी उपलब्धी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना अभियंता शपथ देण्यात आली. संस्थेचे मानद सचिव अभय राजे यांनी प्रास्ताविक केले. कार्यकारिणी सदस्य प्रा. दीपक विधाते यांनी आभार मानले. अभियंता भारतभूषण भागवत व प्रा. दादासाहेब करंजुले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यकारिणी सभासद व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

# घरगुती गणपती देखावा स्पर्धेतून एसा सभासदांच्या कलागुणांना वाव

### किरण गवते यांचे प्रतिपादन; एसा आणि उमा स्टील आयोजित गणपती देखावा (घरगुती) स्पर्धेचे पारितोषिक वितरण, सभासदांचा प्रतिसाद

नगर – देखावे बनवताना कमी खर्चात अथवा चांगले समाज सेवेचे संदेश देणारे देखावे पाहण्यास मिळाले. या निमित्ताने सभासद यांच्यातील कलागुण प्रगट होण्यास आणि त्यांना चालना मिळण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचे नमूद करून उपक्रमाचे परीक्षक किरण गवते यांनी कौतुक केले.

आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो अहमदनगर आणि उमा स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एसा अ' नगर गणपती देखावा स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. संस्थेने प्रथमच या प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन केले होते.



एसा आणि उमा स्टील आयोजित गणपती देखावा (घरगुती) स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसंगी प्रशिक्षक किरण गवते. स्पर्धेत सहभागी पारितोषिक प्राप्त स्पर्धक. (छाया – लहू दळवी)

स्पर्धेचे परीक्षक अखिल भारतीय नाट्य परिषद अहमदनगरचे अध्यक्ष अमोल खोले आणि ब्रँड मेकर किरण गवते यांनी सर्व स्पर्धकांच्या रील आणि फोटो स्वरूपात आलेल्या एंट्रीज चे परीक्षण केले. स्पर्धेचे विजेते पुढील प्रथम क्रमांक विनोद काकडे, द्वितीय क्रमांक जयप्रकाश विधाते, तृतीय क्रमांक अरुण गावडे. तसेच उत्तेजनार्थ राकेश राऊत, शिवम गोंधळे, नितीन कोरडे, सुशांत जगताप आणि उमेश जाजू यांना बक्षीस देण्यात आले. एकूण बत्तीस सभासद आणि त्यांचे कुटुंबीय यांनी या गणपती देखावा स्पर्धेत भाग घेतला.

सांस्कृतिक कमिटी अध्यक्ष अजय दगडे आणि कमिटी सभासद यांनी या आयोजनात पुढाकार घेऊन आटोपशीर नियोजन आणि पारदर्शक असे स्पर्धेचे आयोजन केले. संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी गणपती देखावा स्पर्धा आयोजनातून आणि बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या माध्यमातून सभासदांमधील कौटुंबिक संबंध आणखी दृढ होण्यासाठी तसेच कामाचा ताणतणाव कमी होण्यास मदत होत असल्याचे सांगितले.

उमा स्टील कंपनीचे रिजिनल हेड विजय दगडे यांनी संस्था घेत असलेल्या देखावा स्पर्धा उत्तम प्रकारे पार पाडल्याचे नमुद करून भविष्यात अश्या स्पर्धेला प्रोत्साहन देण्यास आमची नेहमीच तयारी असल्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास कमिटी सभासद अनमोल जैन, भूषण पांडव, सागर ढगे, आशिष कापसे, शुभम खोले तसेच स्पर्धक पंकज जहागिरदार, वैभव फिरोदिया, मकरंद देशपांडे, सुरेश परदेशी, देवेंद्र पोतदार, प्रणाली तांदळे, जितेश सचदेव, स्वप्नील बुराडे, राकेश राऊत, रमेश बोरुडे, वैभव निमसे, महेश तांदळे, रोहित लूनिया आणि कुटुंबीय उपस्थित होते. प्रदिप तांदळे यांनी सूत्रसंचालन केले तर संस्था सचिव अभिजित देवी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# छावणी परिषद कार्यालयद्वारे २७ सप्टेंबरला मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – भारत सरकारच्या महत्वाकांक्षी स्वच्छ भारत मिशनचा एक महत्त्वाचा भाग म्हणून अहमदनगर छावणी परिषद कार्यालयाद्वारे स्वच्छता ही सेवा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानात विविध उपक्रम स्थानिक नागरिक व संघटना यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहेत. आनंदऋषिजी नेत्रालय अहमदनगर व अहमदनगर छावणी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने २७ सप्टेंबर रोजी डॉ. बी आर आंबेडकर कँटॉन्मेंट जनरल हॉस्पिटल या ठिकाणी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून सर्व सफाईकर्मचारी तसेच नागरिक यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम केले जाणार आहे. तसेच शिबिरामध्ये तपासणी केलेल्या रुग्णांसाठी अल्पदरात चष्मे दिले जाणार आहेत व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

शिबिरात नागरिकांनी भेट देऊन आपले डोळे तपासून घ्यावेत असे आवाहन छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडिअर रसेल डिसोजा, मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व नामनिर्देशीत सदस्य वसंत राठोड यांच्याकडून करण्यात आले आहे.

# सिव्हिल सर्जनसह ५ जणांविरूद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यास राज्य आरोग्य संचालनालयाने पोलिसांना परवानगी नाकारली

नगर–तीन वर्षांपूर्वी शहरातील जिल्हा सरकारी रुग्णालयातील कोविड अतिदक्षता विभागास आग लागून तब्बल १४ करोनाबाधित रुग्णांचा जळून कोळसा झाला. तीन जण जखमी झाले. महाराष्ट्राला हादरवणाऱ्या या घटनेसंदर्भात रुग्णालयाचे तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) डॉ. सुनिल पन्नालाल पोखरणा यांच्यासह अन्य पाच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास आरोग्य संचालनालयाने पोलिसांना परवानगी नाकारली आहे.

आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम यांचे हे परवानगी नाकारणारे पत्र तपासी अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांना प्राप्त झाले आहे. त्यांनी या माहितीस दुजोरा दिला. फौजदारी दंड संहिता १९७ अन्वये परवानगी नाकारणाऱ्या या पत्रात न्याय व विधी खात्याचे मत मागवण्यात आले होते, असेही नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनिल पोखरणा, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाखा राजेंद्र शिंदे, आरोग्य कर्मचारी सपना उत्तम पठारे, आस्मा राज्ञाक शेख व अनंत दत्तात्रय चन्ना या पाच आरोपींविरुद्ध दोषारोप दाखल करण्यास परवानगी मागण्यात आली होती. कोरोना संसर्गाच्या तिसऱ्या लाटेत जिल्हा सरकारी रुग्णालयात करोना रुग्णांवर उपचार होणाऱ्या अतिदक्षता विभागात ६ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास भीषण आग लागली. उपचार घेणाऱ्या ११ रुग्णांचा जागेवरच मृत्यू झाला तर ६ जण गंभीर स्वरूपात भाजले गेले. त्यातील तिघांचा नंतर मृत्यू झाला. जिल्हा सरकारी रुग्णालयात घटना घडूनही रुग्णालय प्रशासन किंवा आरोग्य विभागापैकी कोणीही पोलिसांकडे तक्रार दिली नाही. त्यामुळे पोलिसांनी स्वतःहून गुन्हा दाखल केला. शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक जुबेर अहमद चाँदसाहेब यांनी फिर्याद दिली.

यातील सर्व पाचही आरोपी हे सरकारी कर्मचारी असल्यामुळे दोषारोप दाखल करण्यासाठी आरोग्य संचालकांकडे तपासी अधिकाऱ्यांनी परवानगी मागणारा प्रस्ताव पूर्वीच दाखल केला होता. त्यासाठी वारंवार पाठपुरावाही केला. पावणेतीन वर्षानंतर पाचही आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारण्यात आली आहे.

## विचार भारती व बन्सीमहाराजच्या गणेशोत्सव उत्कृष्ट आरास स्पर्धेचे २६ सप्टेंबरला परितोषिक वितरण

नगर – विचार भारती व बन्सीमहाराज मिठाईवाले यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवात घेण्यात आलेल्या उत्कृष्ट गणपती आरास स्पर्धेचे परितोषिक वितरण २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात होणार आहे. यावेळी रा.स्व.संघाचे महाराष्ट्र, गुजरात व गोवा राज्यांचे संपर्क प्रमुख कैलाश सोनटक्के व जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे १४ वे वंशज हभप शिरीष मोरे महाराज यांच्या हस्ते विजेत्या मंडळांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रेडाई संस्थेचे अध्यक्ष अमित मुथा असणार आहेत, अशी माहिती विचार भारतीचे उपक्रम प्रमुख अनिल मोहिते यांनी दिली. परितोषिक वितरण समारंभात शिरीष मोरे महाराज यांचे आशीर्वचनपर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व सर्व ढोल पथकांच्या वादकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक राजकुमार जोशी, अरुण कुलकर्णी, सुधीर लांडगे, महेंद्र जाखेटे, अशोक गायकवाड, अशोक जोशी, गोविंद जोशी आदींनी केले आहे.

# शहरातील नागरिकांनी दोन महिने अडचण सहन करावी; पुढील अनेक वर्ष त्रास होणार नाही : आ. संग्राम जगताप

### आरटीओ ऑफिस रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची केली पाहणी

नगर – शहरातील डांबरीकरणाचे रस्ते पावसाच्या पाण्यामुळे वारंवार खराब होऊन मोठ–मोठे खड्डे पडले जायचे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. रस्त्यांचा कायमस्वरूपी चा प्रश्न मार्गी लागावा यासाठी महायुती सरकारकडे गेल्या दोन वर्षापासून पाठपुरावा केला. त्यामुळे डीपी रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरण कामासाठी मोठा निधी प्राप्त झाला. शहरातील सर्वच भागात रस्त्याची कामे सुरू असून जुने आरटीओ ऑफिस रस्ता अत्यंत खराब झाला होता या परिसरात मोठी लोकवस्ती आहे पुढील वीस वर्षाचे नियोजन करून कामे सुरू असून काम करीत असताना विविध अडचणी निर्माण होत आहे. यामध्ये लाईटचे पोल, पिण्याच्या पाण्याच्या लाईन, जुन्या गटारी आहेत. त्या स्थलांतरित करण्यासाठी वेळ लागत आहे तसेच रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे करीत असताना खोदून करावी लागत आहे.



जुने आरटीओ ऑफिस रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची पाहणी करताना आमदार संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामे करीत असताना अडचण निर्माण होत असेल पण दोन महिने त्रास सहन करा पुढील अनेक वर्ष त्रास होणार नाही. तरी नगर शहराच्या विकासासाठी नागरिकांनी सहकार्य करावे ही विनंती मी करत आहे. आपण सर्वजण मिळून विकास कामातून शहराचा कायापालट करू असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

जुने आरटीओ ऑफिस रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची आमदार संग्राम जगताप यांनी पाहणी केली. यावेळी इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, ठेकेदार एजन्सी आदी सह नागरिक उपस्थित होते.

